
# श्री साईलीला



ऑक्टोबर श्रीसाईबाबा पुण्यतिथी अंक १९७५

किंमत ६० पैसे

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री साई वाक्सुधा

सर्वस्वी गुरु शुश्रूषा करावी ।
बंध मोक्ष वृत्ति विवरावी ।
विद्या विद्यादि प्रश्नीं धरावी ।
गुरुरावीं सफलता ॥१३७॥
आत्मा कोण परात्मा कोण ।
कोणा न सांगावे गुरुवीण ।
गुरुही न येता शरण पूर्ण ।
देती न कणही ज्ञानाचा ॥१३८॥
गुरुविना इतरें देतां ज्ञाना ।
संसार निवर्तक तें होईना ।
मोक्षफल प्रद लवही असेना ।
मना ठसेना कदापि ॥१३९॥
तस्मात् गुरुविना ज्ञान नोहे ।
विदित सकल विद्वानां हें ।
ब्रम्हात्मैक्य विषयीं सोये ।
समर्थ पाय गुरूचे ॥१४०॥
तये न करितां अनमान ।
सांडोनि ताठा अभिमान ।
होवोनि अखंड दंडायमान ।
घालवा मान गुरुपदीं ॥१४१॥
–श्रीसाईसच्चरित अध्याय १७ वा.

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे] आक्टोबर ७५ [अंक ७

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय—

# सप्रेम नमस्कार वि. वि. —

विजयादशमी हा आम्हा हिंदूंना मोठा मोलाचा आणि महत्वाचा शुभ दिवस आहे. प्राचीन काळापासून आमचे पूर्वज या दिवसाचे महत्व जाणून होते आणि कोणत्याही कार्याचा शुभारंभ करण्यासाठी याच दिवसाची निवड करीत असत. साडे तीन शुभमुहूर्तापैकी हा दिवस एक शुभ मुहूर्त म्हणून समजला जातो. परिस्थितीवर विजय मिळवून देणारा असा हा विजयादशमीचा शुभ दिवस आहे.

आणि श्रीसाईबाबांच्या भक्तांना तर या दिवसाचे महत्व आगळेच वाटत असते! विजयादशमी म्हणजे बाबांच्या महानिर्वाणाचा दिवस. मर्त्य देहाचा त्याग करून श्रीबाबा सच्चिदानंदस्वरूपी विलीन झाले तो पवित्र दिवस म्हणजे विजयादशमी.

आज तब्बल सत्तावन्न वर्षे त्या घटनेला झाली. बाबा आज देहाने येथे नसले तरी आपल्या दिव्यत्वाने प्राणरूपाने सध्या आमच्यात वावरत आहेत. समस्त बाबा भक्तांना त्यांचे अस्तित्व पदोपदी जाणवत आहे. आपल्या भक्तांना सोडून बाबा जाणार कुठे आणि जातील कसे? भक्तांच्या कल्याणासाठी त्यांनी मानवदेह धारण केला. माणसात वावरले. त्यांचे भले केले, चमत्कार दाखवले, ज्या ज्या परीने भक्तांचे कल्याण करता येईल, त्यांना मार्गदर्शन करून त्यांचे शुभ करण्याचा मार्ग दाखविता येईल, त्या त्या परीने आपले कार्य पार पाडून ते देहाने आमच्या दृष्टीआड झाले. पण असे जरी असले तरी ते आज आम-च्यात वावरत आहेत. अदृश्य शक्तीने ते आम्हा सर्वांना मार्गदर्शन करीत आहेत. संकट प्रसंगी धावत येऊन आम्हांला संकटमुक्त करीत आहेत.

त्यांनी आम्हाला देऊन ठेवलेले आश्वासन किती मोलाचे आहे? त्यांनी मोठ्या विश्वासाने आश्वासनपूर्वक सांगून ठेवले आहे की —

झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण<br>
माझी हाडे तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥

किती खात्रीपूर्वक व ठासून त्यांनी हे आश्वासन आपल्या भक्तांना देऊन ठेवले आहे बरं! वाक्य माझे माना प्रमाण. माझ्या शब्दांवर संपूर्ण विश्वास

ठेवा. ते मी देऊन ठेवलेले वचन आहे. ते कदापि खोटे होणार नाही! तसेच बाबांनी हेपण सांगून ठेवले आहे की, –

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

या त्यांच्या वचनाचा अनुभव त्यांच्यामागे गेली सतत सत्तावन्न वर्षे साऱ्या भक्तांना येतच आहे की नाही!

श्रीसाईबाबांनी आम्हाला कितीतरी बहुमोलाच्या व शाश्वत कल्याणाच्या गोष्टी शिकविल्या. स्वतः आचरण करून आमच्या गळी उतरवल्या. त्यांनी आम्हाला सर्वधर्मी समानत्व शिकविले. कोणत्याही धर्मात तुमचा जन्म झालेला असेना का, राम आणि रहीम हे एकच आहेत. सारी त्या एका परमेश्वराची लेकरे आहेत. तुम्ही त्याला कोणत्याही नावाने ओळखा. तो आम्हा सर्वांचा परम पिता आहे. मग आम्ही आमचा धर्म कोणताही का असेना एकमेकांशी बंधु-भावाने वागायला नको का! या देशाच्या दृष्टीने किती मोलाची शिकवण आहे ही. ती शिकवण त्यांनी जीवनभर अंमलात आणली व आमच्यासमोर त्यांनी एक उच्चतम आदर्श ठेवला. तो सतत गिरविणे, तो अहर्निश आचरणात आणण्यासाठी झटणे हे समस्त बाबा भक्तांचे कर्तव्य आहे.

आमच्यातील माणुसकी पार लयाला गेली आहे हे पाहून बाबांनी आम्हाला माणुसकीने वागण्याचा, साऱ्या भूतमात्रावर दया करण्याचा, जे संकटात सापडले असतील त्यांना संकटमुक्त करण्याचा संदेश दिला. वाचकहो, तो आम्ही झेलीत आहोत का! त्याप्रमाणे दैनंदिन जीवनात आम्ही वागत आहोत का! याचा विचार संदेशदात्याच्या पुण्यतिथी सारख्या प्रसंगी प्रत्येकाने केला पाहिजे.

बाबांचा खरा भक्त कोण! जो केवळ स्वार्थलंपट व स्वतःपुरते व स्वतः-च्या सुखापुरते पहाणारा तो का? नाही, मुळीच नव्हे. तुम्ही स्वतःपुरते पाहू नका असे सांगण्याची कोणाची छाती आहे? आणि तुम्ही ते ऐकणार आहात थोडेच! परंतु त्याचबरोबर दुःखी पीडित व संकटग्रस्त अशा आपल्या बंधु-भगिनीकडेही लक्ष पुरवा. ती माझी खरी खुरी भक्ती. त्या भक्ताचा मी अंकीत आहे असे बाबा नेहमी सांगत. पण ही एवढी माणुसकी आमच्यात आली आहे का? त्याप्रमाणे आमचे वर्तन घडत आहे का? हे विचार आमच्या अंतःकरणात सतत वावरू लागले पाहिजेत व त्याप्रमाणे आचरण करण्याची सद्भावना आमच्या ठायी निर्माण झाली पाहिजे.

बाबांचे पुण्यस्मरण म्हणजे बाबांच्या उच्च व मानवतावादी शिकवणुकीचे स्मरण. परंतु त्या शिकवणुकीचे जर का आम्हाला विस्मरण झाले तर बाबांचे

भक्त म्हणवून घेण्यास आम्ही कुठवर पात्र ठरतो याचा विचार ज्याचा त्याने करावा. बाबांची अनन्यभावे भक्ती म्हणजे रंजलेल्या गांजलेल्यांसाठी झटण्याची आमची प्रवृत्ती. हिचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हे महत्त्व आम्ही ओळखले पाहिजे. जो दुःखितांचे दुःख निवारण करण्यासाठी झटतो, जो भुकेलेल्यांना भाकर देतो, जो संकटात सापडलेल्यास मुक्त करण्यासाठी आपल्यापरीने झटतो, तो बाबांचा खरा भक्त. यालाच म्हणतात सेवाभाव!

आल्या गेल्याचा आदर करी । तृषितां जल भुकेल्या भाकरी ।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी । देतां श्रीहरी तुष्टेल ॥

या दिव्य शब्दांतून हेच तत्वज्ञान गोवले गेलेले आहे. परोपकार तो हाच. माणुसकी ती हीच. परंतु आमच्यापैकी किती जणांच्या आचरणात हे तत्वज्ञान येत आहे बरे? बाबांची भक्ती म्हणजे भूतमात्राची सेवा. हिचे आचरण ज्या प्रमाणात आमच्याकडून होईल, त्या प्रमाणात आम्ही भगवंताच्या कृपेस पात्र होऊ. या पवित्र पुण्यतिथी दिनानिमित्य या दृष्टीने आपल्या गतकालीन जीवनाचे सिंहावलोकन करून श्रीबाबांनी दाखवून दिलेल्या मार्गाने यापुढील काळात वाटचाल करावयाची आहे. जीवनातील प्रत्येक पाऊल याच रोखाने टाकावयाचे आहे, असा आपण आता निर्धार करू या.

वाचक भक्तांनो, श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथी निमित्त्ताने प्रकाशित होणारा हा अंक आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. साईभक्तांची यथाशक्ति सेवा, अगदी सर्वतोपरीने सेवा हे तर आमचे आद्य ध्येय आहे. ते साध्य व्हावे, वाचकांच्या उपयोगी शक्तिनुसार पडावे ही तर आमची आकांक्षा आहे. परंतु मानवाची शक्ति किती संकुचित व तोकडी आहे! वाचकांची सेवा परोपरीने घडावी, त्यांच्यापुढे मार्गदर्शक होणारे सद्‌विचार भांडार मुक्तपणे खोलावेत असे आम्हास खूप खूप वाटते. परंतु जरूर तेवढ्या प्रमाणात ते अपुऱ्या शक्तिमुळे घडत मात्र नाही. पण हे कार्य बाबांचे आहे ही एकप्रकारे बाबांची सेवाच आहे, या दृष्टीने या तुटपुंज्या प्रयत्नाकडे आम्ही पहातो. त्यात सकसपणा यावा, भरीवपणा, व पूर्णत्व यावे यासाठी तुम्हा सर्वांच्या सहकार्याची श्रीसाईलीलेला फार जरूरी आहे. बाबांचे विचारवंत भक्त जागोजाग आहेत. त्यांनी या कार्यात आम्हाला मनोभावे सहकार द्यावा व हे सेवाकार्य अधिकाधिक उन्नत व सुंदर होईल असे करावे हीच आमची प्रार्थना आहे. जे जे या कार्यात सहभागी झाले आहेत व ज्यांचा प्रेमळ सहकार लाभला आहे, त्यांना शतशः धन्यवाद.

बाबांची पुण्यतिथी आणि पुण्यस्मृती सर्वांचे जीवन उज्ज्वल व उन्नत करो हीच याप्रसंगी आमची अनन्य भावे प्रार्थना. !

# श्रीसाईनाथ मंदिर - नरपड, डहाणू

— लेखक : चं. दा. सामंत

"श्री साईच्चरिता"च्या चाळीसाव्या अध्यायात डहाणू ह्या गावाचा उल्लेख आहे. त्यावेळचे डहाणूचे मामलेदार श्री. बाळासाहेब देव ह्यांनी केलेल्या एका व्रताच्या उद्यापनप्रसंगी श्रीसाईबाबांनी आधी कबूल केल्याप्रमाणे एका संन्याश्याचे वेषाने तेथे जाऊन भोजन केले. त्याचे अत्यंत सुरस वर्णन ह्या अध्यायात आले आहे. श्रीसाईभक्तांच्या दृष्टीने डहाणूला आणखी एका कारणासाठी महत्त्व प्राप्त झाले आहे, आणि ते म्हणजे तेथील श्रीबाबांच्या प्रसादाने बांधले गेलेले त्यांचे मंदिर होय.



डहाणूचे श्रीसाईमंदिर

डहाणू हे ठाणे जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण असून पश्चिम रेल्वेच्या मार्गावर मेल किंवा एक्सप्रेस गाडीने मुंबई-पासून सुमारे अडीच तासांच्या अंतरावर आहे. डहाणूहून जवळजवळ चारपाच मैलांच्या अंतरावर समुद्रकिनाऱ्या लगतच नरपड नावाचे एक गाव आहे. लांबलचक समुद्रकिनारा, हिरवीगार वनश्री, आल्हाददायक वातावरण, विरळ वस्ती व उंचउंच झाडांच्या रांगा ह्यांनी शोभिवंत असलेल्या ह्या गावात श्रीसाईनाथांनी आपले मंदिर एका भक्ताकरवी कसे बांधून घेतले त्याची कथा मोठी मनोरंजक आहे.

डहाणूरोड स्टेशनच्या आवाराबाहेर पडल्यानंतर लगेच उजव्या हाताला एक रस्ता लागतो. त्या रस्त्याच्या सुरुवातीलाच एका कोपऱ्यात "ॲम्बेसेडर कोल्ड्रींक हाऊस" ह्या नावाचे एक छोटेसे दुकान आहे. हे कोल्ड्रींक हाऊस

चालवितात श्री. अडी सोडावाला नावाचे एक पारसी गृहस्थ. लौकिकदृष्ट्या जरी ते श्री. सोडावाला ह्या नावाने ओळखले जात असले तरी ते स्वतःची ओळख "भोलाराम पागल" ह्या नावाने करुन देतात. "क्यों भोलाराम, कैसे हो" अशी श्रीसाईबाबांनी एकदा त्यांच्या स्वप्नात त्यांची विचारपूस केल्यापासून श्री. सोडावाला ह्यांनी भोलाराम पागल हेच नाव धारण केले आहे. सध्या त्यांचे वय ५३ वर्षाचे असून वयाच्या १८ व्या वर्षापासून त्यांनी हिंदी व गुजरातीतून अनेक स्वयंस्फूर्त काव्ये रचली आहेत. सर्वच काव्ये सुबोध असून भक्तिरसाने ओथंबलेली आहेत.

गेली २५ वर्षे म्हणजे १९५० पासून श्री. सोडावाला ह्यांचे वास्तव्य डहाणूत आहे. १९५६ सालची गोष्ट. एके दिवशी एक हरिजन गृहस्थ श्री. सोडावाला ह्यांचे दुकानी आला व त्याने त्यांना नरपड ह्या गावी श्रीसाईबाबांचे एक मंदिर असल्याचे सांगितले. तोपर्यंत त्यांनी नरपड हे नावही ऐकले नव्हते. त्या दिवसापासून मात्र त्यांना ते गाव व मंदिर पाहण्याची उत्सुकता लागली, व एके दिवशी श्री. सोडावाला नरपडला जाऊन पोहोचले. तेथे त्यांना एक छोटीशी झोपडी व आत श्रीसाईबाबांची एक तसबीर आढळली. मंदिराचे ते स्वरूप पाहून तात्काळ त्यांनी श्रीबाबांचे एक अप्रतिम मंदिर तेथेच बांधण्याचा निश्चय केला. निश्चय केला खरा, पण त्यांची स्वतःची आर्थिक परिस्थिती जेमतेमच असल्या कारणाने त्यांनी मंदिराच्या कार्यासाठी वर्गणी जमविण्यास प्रारंभ केला व हे काम पार पडेपर्यंत दाढी न करण्याचा निर्णय घेतला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांना अपेक्षेपेक्षाही लौकर व सुलभपणे देणग्या मिळू लागल्या. मंदिराचे काम झपाट्याने चालू झाले. जेव्हा जेव्हा आर्थिक अडचण उभी राही तेव्हा तेव्हा कोठूनतरी अनपेक्षितपणे पैशाची मदत येई व काम पुढे चालू राही. होता होता मंदिराच्या घुमटाचे काम तेवढे बाकी राहिले.

श्री. सोडावाला, घुमटाच्या बांधकामाविषयी चिंतेत असता अचानक एके दिवशी महंमद पेंटर ह्या नावाचा एक गृहस्थ त्यांच्याकडे आला व आपण घुमटाचे काम करुन देऊ असे त्याने आश्वासन दिले. घुमटाचे काम जवळ जवळ पूर्ण होत आले असता एके रात्री एक चमत्कार घडला. मंदिरानजिक असलेल्या खोपटात महंमदभाई निद्रिस्त असता त्यांच्या कानावर "साईबाबा आया" "साईबाबा आया" असा आवाज आदळू लागला. ते लगेच मंदिराकडे गेले. तेथे त्यांना सध्या ज्या जागी श्रीबाबांचा पुतळा आहे त्याजागी श्रीसाई-



श्रीसाईमंदिरातील श्रीबाबांची मूर्ती

नाथ बसलेले दिसले. महंमदभाई खोपटात परतले व मुलाबाळांना घेऊन परत देवळात दर्शनासाठी आले तेवढ्यात श्रीबाबा तेथून अदृष्य झाले होते. सदर मंदिराच्या घुमटाचे काम प्रेक्षणीय झाले असून तो श्रीसाईकृपेचाच एक प्रकार म्हटला पाहिजे.

श्री. अडी सोडावाला ह्यांचे मावसभाऊ व डहाणूचे एक प्रसिद्ध व्यापारी श्री. सोली होरमसजी मुबारक ह्यांनी स्वत: जयपूर येथे जाऊन श्रीसाईबाबांची शिळेवर बसलेली मार्बलची मूर्ति स्वखर्चाने आणून तिची मंदिरात स्थापना केली आहे. हा पुतळा शिरडी येथील समाधि–मंदिरात असलेल्या पुतळ्या इतका भव्य व सुंदर असून तेथील चौथऱ्यावर चढून पुतळ्याला हार फुले वगैरे अर्पण करण्यास सर्वांना सर्वकाळ मुभा आहे.

मंदिराचे काम पूर्ण झाल्यानंतर श्री. सोडावाला हे शिरडीला गेले व तेथून

ते तडक पुणे येथे श्रीमेहेरबाबांच्या दर्शनाला गेले. श्रीमेहेरबाबांनी त्यांना गाढ आलिंगन दिले व मौन असल्याकारणाने खुणेनेच त्यांनी श्री. सोडावाला ह्यांना "ही दाढी आता काढून टाक. मंदिराचे काम झाले आहे". असा इशारा केला. कर्तव्यपूर्तीच्या आनंदात श्री. सोडावाला ह्यांनी तात्काळ त्या आज्ञेचे पालन केले.

मंदिराची दैनंदिन व्यवस्था तेथील पुजारी श्री. गोविंद अनंत भट ह्यांच्या-वर सोपविलेली असून मंदिराच्या जवळच त्यांच्या रहाण्याची व्यवस्था केलेली आहे. मंदिराचे आवार विस्तीर्ण आहे. तेथेच दूरदूरच्या भक्तांना राहण्यासाठी खोल्यांची उत्तम सोय आहे. उत्सवप्रसंगी विशेषतः रामनवमीला तेथे अतिशय गर्दी जमते. नरपड गावी जाण्यासाठी डहाणू रोड स्टेशनापासून ठराविक वेळी एस्. टी. च्या गाडया सुटतात. तसेच भाडयाने टांगा व ऑटोरिक्षा मिळण्याची-ही सोय आहे.

* *

# श्री सत्यसाईबाबा खास अंक स्थगित


श्री साईलीलेचा ऑक्टोबरचा अंक श्रीसत्य साईबाबा खास अंक काढण्याचे आम्ही गेल्या अंकात प्रसिद्ध केले होते. श्रीसत्य साईबाबा यांच्या पहिल्याच शिर्डी भेटी निमित्य आम्ही अशी ही योजना केली होती. श्रीसत्यसाईबाबांचे शिर्डीस आगमन होणार आहे म्हणूनच की काय श्री. पी. के. सावंत, श्री. वि. स. पागे, श्री पिंगे, श्री. दिक्षित, इ. श्रीसत्यसाई भक्त मंडळी शिर्डीस ऑगस्टच्या अखेरीस जाऊन तिथे सर्व ती सिद्धता करून आली होती. आम्ही श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे त्यांचे यथोचित स्वागत करण्याचे ठरविले होते.

शिर्डीस जाण्यापूर्वी श्री सत्यसाईबाबा प्रथम मुंबईस येणार होते. मुंबापुरीत कावसजी जहांगिर हॉलमध्ये श्रीसत्यसाई सप्ताह दि. १५ ते २२ सप्टेंबर पर्यंत अतीव उत्साहाने साजरा करण्यात आला व त्यावेळी एक भव्य प्रदर्शनही भरविण्यात आले होते. आमचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांनीही निमंत्रणावरून या प्रदर्शनास भेट दिली व संतोष प्रगट केला. मुंबईच्या या सप्ताहभरच्या समारंभास श्रीसत्यसाईबाबा मुद्दाम हजर राहणार होते, व येथूनच शिर्डीस प्रयाण करणार होते. पण श्रीसत्यसाईबाबा मूळात मुंबईतच आले नाहीत त्यामुळे, शिर्डीची त्यांची भेट रद्द झाली आहे. त्यामुळे श्री साईलीलेचा खास श्रीसत्यसाईबाबा अंकही रद्द करण्यात आला आहे. श्रीबाबा शिर्डीस का येऊ शकले नाहीत हे मात्र कळत नाही.

# श्री सद्गुरु ताजुद्दिन बाबा

-- डॉ. अनिल जायस्वाल

आपणापैकी बहुतेकांस माहीतच आहे की श्रीक्षेत्र शिर्डीचे श्रीसाईबाबा, शेगावचे श्री गजानन महाराज व नागपूरचे श्रीताजुद्दीनबाबा हे समकालीन संत होऊन गेलेत. जितके महत्व अजमेर शरीफ व हाजी–मलंगला आहे,



तितकेच महत्व ताजाबाग शरीफ येथील श्रीताजुद्दीन बाबांच्या दरग्याला आहे. या तिघांही संतांचे जीवन चरित्र चाळल्यास अनेक ठिकाणी साम्य दिसून येते. या तिघांची शिकवण व व रहन–सहन सुद्धा कमी–जास्त प्रमाणात जवळ–जवळ सारखीच होती. श्रीताजुद्दीन बाबांच्या समाधीच्या दर्शनाला अद्यापही फार दूर-दूरचा आणि परदेशातीलही भक्त समुदाय येत असतो. आपले 'ऑल इंडिया साई समाजाचे' वर्तमान वयोवृद्ध प्रेसिडेंट श्री राधाकृष्णन स्वामी सुद्धा मागे नागपूरला आले असताना श्रीताजुद्दीनबाबांच्या दर्शनोपरांत

माझ्या निवासस्थानी आलेले होते. श्रीताजुद्दीनबाबांच्या राजे रघुजीनगर येथील निवासस्थानी अजूनही पूजाअर्चा, आरती वगैरे आपल्याच संस्कृतीप्रमाणे होत असते. श्री संत गुलाबबाबा सुद्धा वारंवार त्यांच्या दर्शनाला जात असतात.

श्रीताजुद्दीन बाबांनी उपदेशिले आहे की :—

"जे जे मानवोचित वर्तन व कृति आहे, तेच मला हवे आहे. मी मुसलमान नाही, हिंदु नाही, कोणत्याही धर्माचा नाही – माझा धर्म आहे मानवधर्म आणि त्याचाच मी आशिक आहे.

आपल्या भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी, ज्यांनी या देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले, त्यांना सुद्धा ई. स. सन १९२० साली ते नागपूरला श्री बाबांच्या दर्शनार्थ आले असता, श्रीताजुद्दीन बाबांनीच त्यांना आशिर्वाद दिलेला होता की, "खूप चक्र चालविणे। जे जे कराल ते ते होणे। तदनंतर" अद्यापही ते चक्र आपल्या राष्ट्रध्वजावर अंकीत आहे.

अशा या थोर विभूतीबद्दल थोडे-फार काही लिहून आपणासमोर प्रस्तुत करण्याचे हे जे अमूल्य क्षण या विमूढ पामराला लाभलेले आहे–त्याला माझे भाग्यच म्हणावे लागेल व मी या विभूतीच्या चरित्राबद्दल लिखाण करण्याअगोदर प्रथम श्रीसाई–गजानन–ताजुद्दीन महाराजाला वंदन करून मला योग्य ती प्रेरणा व स्फूर्ति देण्यास आळवितो. तसेच हा लेख लिहिण्यास मला श्री कांत देसाई द्वारा रचित स्तोत्र व हिंदी पुस्तकाचे जे काही थोडे–फार सहाय्य लाभले, त्याकरिता त्यांचे आभार मानतो.

श्रीताजुद्दीन बाबांचा जन्म तारीख १७ जानेवारी ई. सन १८६१ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हजरत सैय्यद बदरूद्दीन व आईचे नाव मरीयम बी होते. अनेक चमत्कार दाखविणाऱ्या या चमत्कारिक संताचा जन्मसुद्धा चमत्काराने परिपूर्ण होता. जन्मल्याबरोबर ते सर्वसाधारण मुलासारखे रडले नाहीत की हातपाय सुद्धा हलविले नाहीत. त्यावेळेस उपलब्ध असणाऱ्या चिकित्सा–प्रणालीनुसार लोखंडाच्या तारा लालभडक तापवून त्यांच्या माथ्याला कित्येकदा डागण्यात आल्या. तेव्हा कुठे यांचा रडण्याचा आवाज पसरला. अहो! या संसारात मनुष्यप्राणि जेव्हा जन्मतो, तेव्हा दुःख व मोहमायेच्या पसाऱ्याच्या भीतिने तो रडत असतो, आक्रोश करीत असतो की त्याला आता हे सर्व भोगावे लागणार. उलटपक्षी मनुष्य जेव्हा मरतो तेव्हा तो स्वतः न रडता, सर्वांना रडवित असतो. मोहमायेच्या पसाऱ्यातून त्याची पूर्णपणे मुक्तता झाल्याकारणाने तो तर मुकाट्यानेच निघून जातो; परंतु त्याचे सगेसोयरे, नातेवाईक, आप्तबंधु अद्यापही त्याच मोहाच्या आवरणाने आच्छादित असल्या-

कारणाने ते बिचारे सारखे रडत असतात. जर आपण जीवंतपणीच या शत्रू-रूपी षड्रिपूंना त्याग केला तर आपणासही सुख-दुःख जाणवणार नाही व मग कोणी जन्मला काय आणि मेला काय, त्याचे आपणावर मुळीच परिणाम होणार नाहीत. किती सुखमय, शांत, एकाग्रतेने ओतप्रोत व आल्हादकारक वाटत असेल 'हे जीवन'? असो –

हे सगळे लिहिण्याचे कारण असे की, श्रीताजुद्दीनबाबा जन्मताना मुळीच रडले नाहीत – अर्थातच संसारातील षड्रिपु किंवा सुखदुःख त्यांचे काहीच बिघडवू शकणार नाहीत याची त्यांना पूर्ण जाणीव होती. ते सर्व निमुटपणे सहन करू – इतका त्यांचा आत्मविश्वास होता. जन्मताच ज्यांचे हे सामर्थ्य व ज्ञान होते तर वाढलेल्या वयात ते कोणत्या पातळीस पोहोचले असेल, याचा वाचकांनीच विचार करावा.

श्रीताजुद्दीनबाबांचे वय दहा-अकरा महिन्यांचे असेल नसेल तोच त्यांचे वडील वारले व वयाच्या नवव्या वर्षीच त्यांच्या मातोश्री स्वर्गवासी झाल्या. बालपणीच 'ताज' अनाथ झाला. लहानपणापासून त्यांना ईशचिंतनाची फार आवड. तरीपण वयाच्या अठरा वर्षापर्यंत त्यांनी कसेबसे शिक्षण संपादन करून अरबी, फारसी, उर्दू व इंग्रजी भाषांचे ज्ञान प्राप्त केले.

एकदा त्यांचे शिक्षक त्यांना शिकवित असताना अनायासे त्या शाळेत श्री संत अब्दुला यांचे येणे झाले. ते त्या शिक्षकास म्हणाले, –

"अरे, याला काय शिकवितोस,
हा तर पूर्वीच शिकून आलेला आहे."

नंतर ते संत ताजुद्दीनास उद्देशून म्हणालेत :—

"कमी खायाचे,
कमी निजायाचे,
कमी बोलायचे-ये याद रख।"

इतके म्हणून त्यांनी आपल्या खांद्यावर लटकविलेल्या झोळीतून काढलेले फळ स्वतः खाल्ल्यावर त्याचा शेष राहिलेला तुकडा श्रीताजुद्दीनास खावयास लावला. त्या क्षणापासूनच श्री बाबांमध्ये फार फरक जाणवू लागला. तीन दिवस पर्यंत ते एक सारखे रडत राहिले. – व त्यांच्या कमलनयनांतून अश्रू सारखे वहात राहिले.

शिक्षण संपविल्यावर श्रीबाबा कामठीला असणाऱ्या मिलिटरी फलटन नंबर तेरामध्ये भरती झाले. त्यांच्यात असताना श्रीबाबांना देश-विदेशात भ्रमण करावे लागले. फरांस वगैरे अनेक ठिकाणी ते जाऊन आलेत. शेवटी

श्री बाबांना मध्यप्रदेशाच्या सागर जिल्ह्यातील मिलिटरीतच काही काळ काढावा लागला. त्यांच्या डेऱ्यानजीकच असणाऱ्या जंगलात, श्रीमंत दाऊद चिश्ती यांची एक फार जुनी समाधी होती. त्याच समाधीच्या दर्शनाला श्री बाबा नियमितपणे जात असत. तिथे ऊद वगैरे जाळून श्रीबाबा उदबत्त्या व दिवे लावित. काही काळ त्या समाधी जवळ बसून ईशचिंतन व ध्यानधारणा करीत. एकदा ईशचिंतनात भक्तीभावाने – गुंग – अवस्थेत असताना, त्यांना साक्षात्कार झाला. आत्मा व परमात्माचा भेदभाव पार वितळून गेला; व श्रीबाबा स्वतः ईश्वराशी एकरूप झालेत. या संसारातील मायेचा प्रपंच त्यांना नकोसा झाला. श्रीबाबांनी मिलिटरीची नोकरी सोडून दिली. अनेक मित्र मंडळींनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्यांचे अधिकारी सुद्धा त्यांना राजिनामा परत घेण्याविषयी विनवू लागले. कारण श्रीबाबांसारखा धाडसी, कर्तबगार व दक्ष इसम त्या फलटणीत एकही नव्हता. परंतु श्री बाबांनी त्यांचे काही एक न ऐकता तेथून काढता पाय घेतला. श्रीबाबा त्याच गावात लोककल्याणार्थ इकडे तिकडे हिंडू लागले. त्यांना त्यांच्या स्वतःची शुद्ध नव्हती. कोणी दिले तर खावे, प्यावे व मोजकेच बोलावे. बहुधा ते एकांतात बसलेले आढळत.

इकडे त्यांच्या कामठीत असणाऱ्या मामांना जेव्हा त्यांनी नोकरी सोडल्याची बातमी लागली, तेव्हा ते स्वतः विचारात पडले. कारण अनाथ झालेल्या श्री ताजुद्दीनाचे पालन पोषण वगैरे सर्व त्यांनीच केलेले होते. आणि लग्न वगैरे न करता त्यांनी ऐन तारुण्यातच चांगल्या पगाराची नोकरी सोडलेली ऐकून मामाला काळजी वाटणे साहजिकच होते. शिवाय विशेष असे की मागील महिन्यातच इकडे येऊन गेलेल्या श्रीबाबांनी नोकरी बद्दल काहीच शिकायत केलेली नव्हती. उलट विदेशातल्या अनेक दुर्मिळ वस्तू त्यांनी त्यांच्याकडे आणून दिलेल्या असताना, तिथल्या किती तरी गमती व आठवणी त्यांना खुशीने हसत हसत सांगितलेल्या होत्या. कमीत कमी मामांशी ते कोणतीही गोष्ट न लपविता मनमोकळेपणाने बोलत असत. मग नोकरी सोडण्याचीच गोष्ट त्याने त्यांचेपासून का लपवावी? काहीतरी त्यांना झोंबले असावे–कोणती तरी प्रेतबाधा त्यांना झाली असावी? त्याचा इलाज करवुन जर तो स्वस्थ झाल्यास कसे तरी करून त्याला पूर्ववत नोकरी लावून द्यावी, याच उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी बाबांस स्वतः जाऊन कामठीस घेऊन आले. इलाज सुरू झाला. अनेक हकीम आले, वैद्य आले, जरी, जाणते सर्व झाले. तरी श्रीबाबांना काही गुण आलाच नाही. शेवटपर्यंत त्यांचे हे पागलपण त्यांच्या सोबतच टिकले.

कामठीस असताना रोजची त्यांची एकच दिनचर्या. कधी कपडे घालावेत तर कधी नागवेच हिंडावे. उकिरडयावर जावे. सांडलेले अन्न गोळा करुन आनंदाने खावे. कुत्र्यांवर त्यांचे अतोनात प्रेम होते. कित्येकदा स्वतः उपाशीपोटी राहून एकत्रित केलेले अन्न पूर्णच्या पूर्ण ते कुत्र्यांना जेवू घालीत. लोक त्यांना 'पागल' म्हणत असत. कधी कधी एकाच ठिकाणी श्रीबाबांनी अनेक तास बसावे. लाळ गळत आहे. माश्या झोंबत आहेत. परंतु त्यांना कशाचीही शुद्ध नसायची. ते आपल्या ईश–चिंतनातच नेहमी गर्क असायचे.

एकदा संध्याकाळी श्रीबाबा असेच ईशचिंतनातून एकाएकी उठले. जवळच राहणाऱ्या एका सोनाराच्या घरासमोर उभे राहून त्यांनी त्याला 'आताच्या आता घर रिकामे करण्याविषयी' सक्त ताकीद दिली. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी श्रीबाबांची अनेक प्रकारे थट्टा केली. कुचेष्टा केल्या, टिंगल उडविली. पण त्याचा श्रीबाबांवर काहीही परीणाम झाला नाही. त्यांचे ओरडणे व बड-बडणे सतत चालूच होते, :– "घर खाली कर ' ' घर खाली कर ' ' ' जल्दी कर । देखता क्या है । वरना तुफान आयेगा और तुझे निगल जायेगा। जल्दी कर । सब बाहर ले आ । वक्त थोडा ही है । मैं तुम्हें बचाऊंगा ।"

परंतु काही थोडयाबहुत लोकांना त्यांच्यावर अटळ विश्वास होता. हा विश्वास, चमत्कार पाहून नव्हे–स्वयं प्रेरणेने निर्माण झालेला होता. त्यांना नेहमी वाटायचे ही विभूती अशी तशी नसून त्याच्या मागेही काही रहस्य आहे! न जाणो परमेश्वर कोणत्या रूपात हिंडत असेल. अशाच काही श्रद्धाळू मंडळी पैकी हा सोनार होता. त्याला पटले की श्रीबाबांच्या अशा ओरडण्यामागेही काहीतरी मर्म आहे. नाहीतर सदा शांतचित्त व कोणाशीही जास्त न बोलणारा हा वेडा – अवलिया कशाला नेमका त्याच्याच दारावर उभा राहून विनाकारण ओरडणार? त्याने वेटाळांतल्या व्यक्तींचे काहीही न ऐकता तावडतोब श्री बाबांच्या सल्ल्याप्रमाणे सामानसुमानासहीत पूर्ण घर रिकामे केले. आणि आश्चर्य असे की मध्यरात्रीच्या सुमारास आपोआप त्या घराच्या भिंती कोस-ळून पडल्या व छप्पर सुद्धा जमिनीवर आदळले ! त्या सोनाराने आपल्या कुटुंबातील सर्वांचे प्राण वाचविल्याबद्दल श्रीबाबांची अश्रूपूर्ण डोळ्यांनी साष्टांग चरण वंदना केली. त्यासोबतच वेटाळातील अनेक रहिवाशांनी पैकी काहींनी साष्टांग नमस्कार केला, कोणी रामराम केले; तर काहीना त्याचीसुद्धा लाज वाटत असल्याकारणाने दुरुनच हात हालवून टा ' ' टा ' ' केले, काहींनी श्रीबाबांना खांद्यावरच उचलले व काहींनी उड्या मारुनच आपला आनंद व्यक्त केला. परंतु या घटनेनंतर सर्वांना कळून चुकले की, हा साधासुधा वेडा

नसून दैविक शक्ती आहे – ईश्वरीय अवतार आहे. खरेच आहे कोणी म्हट-लेल्या या ओळी :—

चमत्कार कोणी दावितां ।
लोक नमविती माथां ॥
अन्यथा जगन्नाथा ।
पुसती ना त्या कोणी ॥

परंतु श्रीबाबा तर पूर्ण योगी होते. त्यांना या कीर्तीची काय किंमत वाटणार? तरीपण अचानकपणे अशा रीतीने जमलेल्या भक्तसमुदायास उद्देशून श्रीबाबा म्हणाले :—

"अभी कुछ टेम और है। फिर यह जगह भी छोडनी होगी। न जाने कहां कहां भटकना पडे।"

काही दिवस गेले. काही महिने लोटले आणि एका रात्री श्रीबाबा कामठीतील एका इंग्रजी क्लबासमोर जाऊन अगदी नंग धडंग उभे झाले. तिथे असणाऱ्या गोऱ्या स्त्री–पुरुषांना असल्या कुचेष्टा करणाऱ्या या वेड्याचा राग आल्यामळे त्यांनी श्रीबाबांना पोलीसांच्या स्वाधीन केले. त्यांच्या त्या गैरवागणुकीबद्दल त्यांचेवर खटला चालविण्यात आला व ता. २६ ऑगस्ट ईसवी सन १८९२ साली न्यायाधिशाने हुकूम काढला, त्यानुसार त्यांना नागपूर येथील वेड्यांच्या इस्पितळात हालविण्यात आले व तिथेच पुढे श्रीताजुद्दीन बाबांनी जवळ जवळ सोळा वर्षे निवास केला.

परंतु सर्वशक्तीमान, निर्विकार व निर्गुण परमात्म्याला कधी कोणीतरी कोंडून ठेऊ शकतो काय? तसेच श्री ताजुद्दीनबाबा विषयी झाले. कधी कोणास ते बाहेर हिंडताना दिसत. कधी रुग्णालयाच्या पटांगणात उघड्यावरच झोपलेले दिसत. कधी रात्री अपरात्री झाडाच्या फांद्यावर बसलेले दिसत. पहारेकऱ्यांना आश्चर्य वाटावयाचे की त्यांनी तर वेड्याच्या खोलीची कुलुपे आत्ताच पडताळून पाहीलेली आहेत. मग हा 'पागल' बाहेर कसा राहून गेला. लगेच ते पहारेकरी श्री बाबांना धरावयास धावावयाचे. परंतु श्री बाबांनी जागच्या जागीच अदृश्य व्हावयाचे. पहारेकरी पुन्हा त्यांच्या खोलीची तपासणी करून परत आले असता त्यांना श्रीबाबा खोलीत शांतपणे निद्रावस्थेत दिसायचे. बाहेरुन कुलूपगुडा जसेच्या तसेच बंद असे. सुरवातीस पहारेकरी "आपलीच कदाचित भूल झाली असावी – किंवा आपल्याच दृष्टीला भ्रम झाला असावा" म्हणून गप्प राहिले. परंतु श्रीबाबांचे रोजचे हे चाळे बघून त्यांनी आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्यास असल्या या रोजच्या चमत्काराविषयी सूचना दिली.

त्यावेळेस डॉ. अब्दुल मजीद खां साहेब या दवाखान्याच्या इन्चार्ज पदावर आरूढ होते. परंतु पहारेकऱ्यांनी ही माहिती आणण्या अगोदरच स्वत: डॉक्टरास सुद्धा या वेड्याविषयी काही अद्भूत प्रकार प्रत्यक्ष अनुभवास आलेले होते. डॉक्टरांनी श्री बाबाना या बद्दल विचारपूस केली असता ते म्हणाले :—

"क्या हैरतकी बात है?
हवा तो है ।
आती भी है । और जाती भी है ।"

व पागलखान्याचे डाक्टरसाहेब स्वतः पागलखान्यात असणाऱ्या या पागल म्हणविणाऱ्या बाबांचे पहिले भक्त झाले. 'यथा राजा तथा प्रजा' या म्हणी-प्रमाणेच हळूहळू वेड्यांच्या इस्पितळाचे सर्व कर्मचारी श्रीताजुद्दीनबाबांचे निस्सीम भक्त बनले.

जर भक्त बनूनच आपण आपले स्वार्थ साधू शकलो, आपल्या मनोकामना पूर्ण होत असल्या, कोणतीही इच्छापूर्ती होत असली तर भक्त बनायला कोण तयार होणार नाही? आपणसुद्धा स्वत:ला 'साईभक्त' म्हणवून घेऊन दरवर्षी शिर्डीची वारी करीत नाही काय? परंतु खोलवर विचार केल्यास असे आढळून येईल की आपणसुद्धा शिर्डीस जातो ते फक्त आपल्या इच्छापूर्तीसाठीच. मग ते स्वार्थ गाठणे नव्हे काय? कधीही कोणतीही इच्छा न बाळगून आपण कधी श्रीसाईबाबांच्या दर्शनार्थ शिर्डीला गेलो काय! नाही. कधीच नाही. आपण तिथे जातो खरे, पण नेहमी आपले रडणे ऐकविण्यासच शिर्डीस श्री साईबाबां-च्या दर्शनार्थ जात असतो. आपण तिथ पूजा करतो श्रीबाबांना स्नान घालतो, त्यांना आळवितो. त्या सर्वांमागे आपली स्वार्थ बुद्धी काम करीतच असते. – आपण आलेले संकट दूर करण्यासाठी, आपले काम पूर्ण होण्यासाठी व नानाप्रकारच्या कल्पना व ईच्छेच्या पूर्तीसाठीच आपण त्यांना विनवित असतो. जर ती इच्छा श्रीसाईबाबांनी पूर्ण केली तरच आपण केलेले नवस फेडण्यासाठी – साईसत्यनारायण करतो, श्री साईबाबांना चादर चढवतो व अनेक प्रकारच्या वस्तू व देणगी संस्थानाला देऊन मोकळे होतो. आपल्या सारख्या साईभक्तासाठी आपली पूर्ण सुख-सोय बघण्याकरीता, संस्थान व तेथील कर्मचारी वर्ग आहेच की. आपण 'साईभक्त' म्हणून ते आपणास 'भक्त-निवासात' आपल्या राहण्याची व्यवस्था करतात; आपल्या गाद्या-बिछान्या पासून तर जेवण व शौचाला जाण्यापर्यंतची व्यवस्था करून ते आपल्या सेवेत रात्रंदिन खपत असतात. वाचनालयापासून इस्पितळापर्यंत सर्व काही या संस्थानाच्या देखरेखीखाली आहे. म्हणजे आपल्या करमणुकीपासून आजारी

पडल्यापर्यंतची व्यवस्था व बंदोबस्त तिथे आहे. माझ्या म्हणण्याचा उद्देश इतकाच की काही थोडया व्यक्तींना सोडून दिल्यास बाकी आपण सर्वजण खऱ्या अर्थाने साईभक्त नाहीच. आपण आपल्या आत्म्याच्या सुखाकरिता व या नश्वर संसारातील अडचणी दूर करविण्याकरिताच शिर्डीला जात असतो. तेथेही आपल्या आत्म्याला पूर्ण सुख लाभावे व काही त्रुटी न व्हावी ह्याच उद्देशाने तेथील संस्थान आपल्या सेवेत कार्यरत असते. परंतु हा सगळा आपला स्वार्थच असतो; आपण नेहमी आपल्या आत्म्याचीच काळजी वाहतो, परमात्म्या-कडे (परम–आत्मा–परमात्मा) आपले लक्षच नसते, तर भक्ती कोठून येणार? थोडक्यात सांगायचे म्हणजे आपण श्रीसाईबाबांची निस्वार्थ भक्ती कधीही केलेलीच नाही. आपण आपले निस्वार्थ प्रेम व निस्वार्थ सेवा त्यांना दिलेलीच नाही. श्रीसाईबाबांना हवी आहे तुमची निस्वार्थ सेवा, निस्वार्थ भक्ती, व निस्वार्थ प्रेम व नेमके तेच आपण त्यांना अर्पित नाही. म्हणूनच "श्री साई-चरित्रात" श्रीबाबा म्हणतात

माझे सरकार न्या न्या वदे ।
मजलाच जो तो म्हणे दे दे ।
कोणी न माझ्या बोलासी लक्ष दे ।
एकही सुधे ऐकेना ।
उतून चालीला आहे खजिना ।
एकही कोणी गाडया (प्रेमस्वार्थ) आणीना ।
खणा म्हणता (निस्वार्थ सेवा) कोणीही खणीना । (निस्वार्थ
भक्ती) प्रयत्न न कोणा करवेना ।। (अध्याय ३२)

याचा अर्थ खोलवर विचार केल्यास असाच निघतो की :—

"हे मानवा ! ईश्वराजवळ अगाध प्रेमाचा सागर (खजिना) काठोकाठ भरून वहात आहे । ईश्वर म्हणतो हे ने. हे तुझ्याकरिताच आहे । परंतु कोणा एकालाही ते ऐकण्याची शुद्धी (सुधे) नाही । जो तो माझ्याकडेच येऊन "दे–दे" म्हणतो । परंतु कोणी सुद्धा निस्वार्थ प्रेम, निस्वार्थ सेवा व निस्वार्थ भक्ती आणित नाही की करीत नाही (खणीना) । व त्याचा प्रयत्न सुद्धा तू करीत नाहीत । प्रयत्न अर्थातच कठीण आहे तरीपण ते तू करून तर बघ ॥"

पुढे म्हणतात :–

"खऱ्या माईचा पूत असावा ।
तेणेच भरावा भांडार ॥

अर्थातच असे करणे इतके कठीण आहे की आपणा अल्पमती पामरांच्या आटोक्याच्या बाहेरची ती गोष्ट आहे. जो हे करु शकेल; ईश्वराचे प्रेम (भांडार) संपादीत (भरावा) करण्याचा अधिकार फक्त त्यालाच (तेणेंच) आहे.

पुढे त्यातच उल्लेखित आहे कीं

प्रसिद्ध बाबा अब्दुल रहिमान ।<br>
मौलाना साब महमद हुसेन ।<br>
बाबा साईबाबा ताजुद्दीन ।<br>
इंहीं न तें स्थान त्यागिले ॥२९॥ साईसच्चरित्र

(अध्याय ४१)

म्हणजे जे स्थान श्री साईबाबांना आहे तेच स्थान श्री बाबा ताजुद्दीनला आहे. ते सुद्धा या निस्वार्थ प्रेम, सेवा व निस्वार्थ भक्तीचे भुकेले आहेत. स्वार्थी भक्त तर अनेक गोळा होतात व असाच भक्त समुदाय वेड्यांच्या इस्पितळात सुद्धा श्रीताजुद्दीन बाबांच्या भोवती गोळा झाला होता. दिवसें दिवस एका कानावरुन दुसऱ्या कानावर गोष्ट जाऊन श्रीताजुद्दीन विषयी बरीच प्रचिती झाली व त्या पागलखान्यात पागल नसणारे सर्वसाधारण लोक-सुद्धा श्रीबाबांच्या दर्शनार्थ येऊ जाऊ लागले. व यावर कोणीच आक्षेप घेतला नाही हे पण तितकेच खरे.

पाटना येथील वैद्यकीय महाविद्यालयाचा तो एक हुषार विद्यार्थी. त्याचे नाव काशिनाथ पौनसकर. एकदा हे पौनसकर गंगेत स्नान करावयास गेले असताना तेथेच एका संताशी त्यांची ओळख झाली. त्या संतांचे नाव होते ब्रम्हचारी बाबा. या संत ब्रम्हचारीबाबांनी या वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या पौनसकराला योगसाधनेने आपल्याकडे आकर्षित करून घेतले व त्याला दैविक आत्मोन्नतिचा मार्ग दाखविला. त्यांच्या उपकारांचे ऋण फेडण्याकरिता या पौनसकराने विद्यार्थी दशेत असे ठरवून घेतले होते की; "मी डॉक्टर झाल्यावर कोणत्याही चांगल्या पदावर नोकरी मिळताच या श्रीसंत ब्रम्हचारी बाबांना संपूर्ण यात्रा घडवून देईन". पुढे हे डॉक्टर बनताच यांना नागपूर येथील वेड्याच्या इस्पितळात वैद्यकीय अधिकाऱ्याच्या पदावर नोकरी लागली. पूर्वीचे डॉ. अब्दुलमजीद हे सेवानिवृत्त झाले. लगेच ब्रम्हचारी बाबांना दिलेल्या आश्वासनाची डॉ. पौनसकरांना आठवण झाली. आणि चमत्कार असा की हे श्रीसंत ब्रम्हचारीबाबा त्याचवेळेस त्यांचेसमोर उभे झाले. क्षणभर डॉ. पौनस-

कर साहेबांना या घटनेचे आश्चर्यच वाटले; व त्वरित त्यांनी बाबांसोबत तीर्थयात्रा पूर्ण केली. हे दोघेही परत आल्यावर श्रीसंत ब्रम्हचारी बाबांनी इस्पितळाच्या दरवाज्यातूनच जोराने हाक मारली व म्हणाले, "अरे भाई ताजुद्दीन, मैं इसको तेरे हवाले कर रहा हूं । इस बच्चेका जरा खयाल रखना." श्री ताजुद्दीनबाबा आतूनच ओरडले, "अरे यार तू जाना ! उसीकी-ही प्रतीक्षामें तो मैं यहाँ कबसे आकर–उसका इंतजार कर रहा हूँ । वह तो अपनेही बिरादरीका है । वह कहा जा सकता है?" डॉक्टरला त्यांच्या या संभाषणाचा काहीच उलगडा झाला नाही. गंगेच्या काठी मिळालेल्या संताने या पागलखान्याच्या वेड्याला पूर्व परिचितासारखी हाक कशी मारली व तोसुद्धा कसा काय उत्तरला? हे विचारचक्र त्यांच्या डोक्यात चालू असतानाच त्यांनी, तोंडात बोटेच घालणारी ही घटना पाहिली की 'संत ब्रम्हचारी बाबा जागच्या जागीच अदृश्य होऊन हवेत विलीन झाले.' त्यांना हे पाहून आश्चर्याचा धक्काच बसला.

वरील गोष्ट नागपूरातील थोर साहित्यिक व तत्वज्ञ श्री जी. वाय. देशपांडे साहेबांनी ता. २८ जुलै १९५७ च्या "नागपूर टाइम्स" या इंग्रजी वर्तमानपत्रात प्रकाशित केलेली होती. खालील दिलेल्या काही उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की ..... Miracles were a mere child's play for Tajuddin Baba .... म्हणजे श्री ताजुद्दीनबाबांसारख्या महान विभूतीला आश्चर्यकारक घटना घडवून आणणे हे फक्त मुलाबाळांसारखे खेळ होऊन गेलेले होते.

एके दिवशी एक वेडा इस्पितळातून पळून गेला असताना डॉक्टरसाहेब चिंताग्रस्त अवस्थेत खुर्चीवर बसलेले होते. श्रीताजुद्दीनबाबा त्यांना म्हणाले :– "अबे फिकीर क्यों करता है! कल सुबोही वह लौट आयेगा!" आणि खरो-खरच पळालेला वेडा दुसऱ्या दिवशी सकाळी आपोआप, श्री बाबांनी वर्तविल्या भविष्याप्रमाणे परत आला. डॉक्टर पौनसकर साहेबांनी त्यास विचारपूस केली असता तो म्हणाला, "इसी ताजुद्दीनने तो मुझे घसीटकर यहाँ लाया! रातेस्मे कई दफा इसने मुझे मारा भी!" व ही सगळी घटना खोलीत बंद असलेले श्री बाबा पाहत होते व स्मित करीत होते. डॉक्टरच्या मतानुसार या मध्यंतरीच्या काळात श्री ताजुद्दीनबाबा कोठेही बाहेर गेलेले नव्हते. ते आपल्या खोलीतच बंद होते. आणि हा वेडा म्हणत होता की त्यांनीच याला सोबत परत आणले. डॉ. पौनसकर साहेब जरा आधुनिक विचारांचे तरुण युवक असल्याकारणाने "या वेड्याच्या संभाषणाने आपण तरी वेडे बनू नये" या नियमानुसार त्यांनी

या घटनेकडे पूर्ण दुर्लक्ष केले. परंतु श्री संतब्रम्हचारी बावांचे द्रवेन विलीन होण्याचे प्रकरण ते विसरले नव्हते; आणि दुसऱ्याच दिवशी घडून आलेल्या प्रसंगावर ते अविश्वास करू शकले नाहीत..

ती गोष्ट अशी. डॉ. पौनसकरांचे ऑफिस श्री ताजुद्दीनबाबांच्या खोलीस लागूनच होते. एकाएकी श्री ताजुद्दीनबाबा त्यांच्या समक्ष उभे झाले. भिंतीतून दैविक स्वर उद्‌भवला, "अस्सलाम अलैकुम" व अचानकपणे त्या भिंतीत एक फार मोठी भेग पडली. त्यातून एक दैविक हाताचा पंजा बाहेर आला. श्री बाबा प्रत्युत्तरले, "वालैकुम अस्सलाम" असे म्हणतच श्री बाबांनी त्या पंज्याशी हस्तांदोलन केले व त्या पंज्यासोबत श्रीबाबा भिंतीत गेले. व ती भेग दिसेनाशी होऊन भिंत पूर्ववत झाली. श्रीबाबांना भिंतीत समावलेले पाहून डॉक्टरसाहेब धावतच श्रीबाबांच्या खोलीत गेले. परंतु श्रीबाबा ताजुद्दीन तिथे शांत बसलेले दिसले. अर्थातच डाक्टर पौनसकरांचा सुद्धा त्यांच्यावर विश्वास जडला गेला व ते श्री बाबांचे निष्ठावान भक्त झाले हे सांगणे नकोच. श्री बाबा त्यांना उद्देशून म्हणाले होते, "शिर्डी जवळ असणाऱ्या साकोरी ग्रामी तू जा. तिथे तुझे गुरू उपासनी महाराज तुझी वाट पहात आहेत" वाचकांनो आपणास आठवत असेल की त्याचकाळी शिर्डीतील खंडोबा देवळाचे पू. उपासनी महाराज श्रीसाईबाबांच्या आज्ञेप्रमाणे साकोरीला स्थित झालेले होते व अद्यापही श्रीसती गोदावरी मातेने पू. उपासनी महाराजांनी उद्देशिलेले कार्य सुरू ठेव-लेले आहे.

दिनांक १० सप्टेंबर १९०७ रोजी मद्रासचे श्री अब्दुल वहाब साहेब यांचे पोष्ट ऑडिट ऑफीस नागपूरला रूजू असताना कोणाच्या तरी सांगण्या-वरून ते इस्पितळात श्रीताजुद्दीन बाबांच्या दर्शनार्थ गेले असताना श्रीबाबा त्यांना म्हणाले :— "आवो! मदरासी भाई । मेरा वतन भी मदरास है । दफ्तर लेकर आये है । दफ्तर लेकर जायेंगे । आवो, जरा पैर दबावो।" त्यांना नवलच वाटले की श्रीबाबांना कसे अवगत झाले की मी मदरासहून आलेलो आहे. ते त्यांचे पाद-सेवनामध्ये गर्क असताना अचानक श्रीबाबांची नाडी बंद पडली, हृदयाचे स्पंदनही बंद पडले. व श्वासोश्वास बंद पडून त्यांचे शरीर शवाप्रमाणे थंडगार पडले, ही स्थिती अंदाजे १५ मिनिटे तरी असेल. वहाबसाहेब अधिकाऱ्यांना कळविण्यास उठणार तोच श्री बाबा स्वतः उठून बसले. ही घटना श्री साईबाबांच्या योगिक-क्रियेशी किती तंतोतंत मिळते याचा वाचकांनीच विचार करावा.

डॉ. पौनसकरसाहेबास मक्का शरीफवरुन श्रीबाबांच्या दर्शनार्थ आलेल्या एका यात्रेकरुने कळविले की श्रीताजुद्दीनबाबा स्वत: २१ दिवस त्याच्यासोबत मक्का-मदिना येथे होते. त्यांनीच त्याला येथल्या पत्त्यावर बोलाविले आहे. "त्यांची खोली जरा दाखविण्यात यावी" असे तो म्हणाला असता, डॉक्टर साहेबांनी एका चपराशाद्वारे त्याला तिकडे पाठवून दिले, व पूर्ण रेकॉर्ड चेक केला. श्री बाबांची त्याच्यांत एक दिवसाचीही गैरहजरीची नोंद नसताना देखील ते मक्का मदिनास २१ दिवस कसे जाऊ शकतात? हे कोडे शेवटपर्यंत उल-गडले नाही. डॉक्टरसाहेब अश्रूपूर्ण नेत्रांनी श्री बाबांच्या पायावरच पडले असताना श्री बाबा म्हणाले :- "लंबी नको करो रे । लंबी नको करो रे।" (म्हणजे याचा प्रचार करू नको रे) व तितक्यात श्रीबाबा एका स्नायुरोगाने पीडित असणाऱ्या इसमाच्या हाताची बोटे धरुन उद्गारले, "बडी जलन रे । बडा दर्द रे। व तेव्हापासून खरोखरच त्या रुग्णाच्या शरीराची आग व दुखणे पार थांबले.

एक गोरा अधिकारी डॉ. पौनसकर जवळ बसला असताना तिथे श्रीबाबा आले व म्हणाले, 'यहाँ क्या कर रहा है बे। उधर बिबीका इंतकाल होगया और तू यहाँ मस्तीकी छान रहा है।" तो ऑफिसर पळतच आपल्या बंगल्यावर गेला व तितक्यातच पोष्टमनने त्याच्या बायकोच्या निधनाची बातमी असलेली तार देऊन सही घेतली.

एकदा एक व्यक्ती श्रीबाबांजवळ येऊन त्यांना विनवू लागली. त्याच्या मुलीची तबियत फारच बिघडलेली होती व मरणासन्न अवस्थेत ती असताना, हा इकडे धावून आला होता. थोड्यावेळपर्यंत श्रीबाबांनी डोळे मिटले व उघडून म्हणाले, "जा बच्ची ठीक है।" खरोखरच मुलीच्या प्रकृतीत पूर्ण सुधार झाला होता.

त्यावेळचे डेप्युटी कमिशनरच्या - एका भावाच्या अनुभवाप्रमाणे त्यांनी श्री शंकरजी, श्रीरामचंद्र प्रभू व श्रीकृष्ण भगवान या सर्वांना एकामागून एक याप्रमाणे येताना पाहिले. समोर असलेल्या सिंहासनावर ते सर्व बिराजमान झाले. सर्वामागे आलेले श्री ताजुद्दीनबाबा निकट असलेल्या खुर्चीवर बसले. हे निद्रावस्थेतील स्वप्न नसून त्याच्या पूर्णपणे जागृत अवस्थेतील घडून आलेला हा दृष्टांत आहे असे म्हटले जाते व या गोष्टीचा उल्लेख श्रीताजुद्दीनबाबांवर उपलब्ध असणाऱ्या अनेक ग्रंथात आढळतो.

अशीच एक गोष्ट प्रचलित आहे की वाकी-शरीफ येथील मिर्जा नावाची एक वेश्या मेलेली असताना श्रीबाबांनी आशीर्वादास्तव पाठविलेल्या चहाचे

काही थेंब तोंडात पडताच उठून बसली, त्याचप्रमाणे बालाजी पेठ अमरावतीचे एक वयोवृद्ध पुरुष, श्री दिगंबरराव देशमुख, सांगतात की ते लहान असताना त्यांची आई ता. १२–४–१९२१ ला स्वर्गवासी झाली होती. खूप रडून रडून थकल्यामळे शेवटी हे रात्री झोपले असताना श्री बाबांनी स्वप्नात येऊन आई जिवंत होईल असे कळविले. दुसऱ्या दिवशी खरोखरच त्यांची मेलेली आई स्वतः उठून बसली व त्यानंतर १९३० पर्यंत म्हणजे अंदाजे ९ वर्षे ती जिवंत राहिली.

'तारा' नावाची एक भक्तीण श्री बाबांच्या दर्शनार्थ आली असताना तिने आपल्या बरोबर स्वतःच्या हाताने भक्तीभावाने व श्रद्धेने तयार केलेली भोजन-सामुग्री शिदोरीत बांधून आणलेली होती. परंतु श्री बाबा त्यावेळेस राजमहालात असल्यामळे तिला ती शिदोरी श्रीबाबांना देण्याची हिंमतच झाली नाही. तिने तिथेच एका वृक्षाला लटकवून ठेवून दिली. व दुरूनच श्रीबाबांचे दर्शन घेत उभी राहिली. श्री बाबांच्या जेवणाची वेळ झाली असताना अनेक पक्वान्नांनी भरलेले सोन्याचे ताट घेऊन श्रीमंत राजे रघुजीराव भोसले हे स्वतः त्यांच्या सेवेत उभे झाले. श्रीबाबा म्हणाले :–

"मुझे ये नहीं वो लावो जो पेडपर टंगा है"

अर्थातच सेवकांनी हजर केलेली 'ताराची शिदोरी' श्री बाबांनी ग्रहण केली. दुरूनच पहात असणारी तारा सुखावली, कृतार्थ झाली. ही घटना शेगांवचे श्रीगजानन महाराजांच्या जीवन चरित्रात उल्लेखित असणाऱ्या घटनेशी किती तंतोतंत मिळते याचा प्रिय वाचकांनीच विचार करावा.

शेवटी सप्टेंबर १९०८ साली तो शुभ दिन उजाडला. नागपूरचे राजे श्रीमंत रघुजीराव भोसले यांनी बरीच खटपट केली व २००० रुपयांची अमानतसुद्धा भरली. त्या पागलखान्यात इतक्या दीर्घकाळपर्यंत निवासित असलेले सद्गुरु श्री ताजुद्दीनबाबा यांची सुटका करण्यात आली. अर्थातच श्री बाबांना त्यांचेकडून हे कार्य करवून घ्यावयाचे होते. पुढे श्री बाबांनी त्यांच्या आग्रहास्तव रघुजीनगर येथील राजमहालातच निवास केला, हे या भोसले घराण्याचे भाग्यच म्हणावे लागेल. स्वतः राजेसाहेबांनी श्रीबाबांची फारच सेवा केली.

भर उन्हाळ्याची गोष्ट. एकदा बाबा काही भक्तमंडळी सोबत दिघोरीस गेले होते. त्यांच्यासाठी पिण्याकरिता थंड पाणी आणले असता श्री बाबांनी ते स्वतः न स्वीकारता ओरडून म्हणाले ;

"अरे घोडेकु लगी पियास । पहले उसकु फिर हमकु।"

भक्तांनी इकडे तिकडे पुष्कळ तपास केल्यावर अंदाजे अर्ध्या मैलावर तहानेने

व्याकूळ झालेला एक घोडा आढळला. जवळजवळ पाच गुंड पाणी प्याल्यावर त्याची क्षुधा शांत झाली व नंतर चैतन्याने उड्या मारीत तो पळून गेला. श्री बाबांची प्राणिमात्रांवर किती दया होती, हे या उदाहरणावरून व्यक्त होते.

सदा त्यांचेच सेवेत हजर असणारा हनुमन्तराव हा श्री बाबांचा फार निष्ठावान व भावूक भक्त होता. त्याला वाटले की आपणसुद्धा मुसलमान धर्म स्वीकारल्यास श्री बाबा खूप होऊन सदैव आपल्यावर मेहरबानी राखतील. श्री बाबांनी योगसामर्थ्याने त्याचे हे विचारचक्र ओळखले; व म्हणाले :– "अरे तू नियमित गीता वाच । त्यात उद्देशिल्याप्रमाणेच आपले आचरण व व्यवहार ठेव । यही उस परवरदिगार अल्लाकी खिदमत, श्रीकृष्ण की पूजा और ईसामसिह की सर्व्हिस है।"

असेच दुरून आलेल्या सरकारी नोकरीवर असणाऱ्या इसमास श्री बाबांनी एक महिन्यापर्यंत बळजबरीने रोखून ठेवले. पुढे या इसमास आढळून आले की त्याच्या ऑफीसात एकही दिवसाच्या गैर हजेरीची नोंद नसून प्रत्येक तारखेस त्याचे हस्ताक्षर मांडलेले होते. याचा अर्थ असा की तो इकडे असताना त्याच्याच स्वरूपात त्याचे कार्य संपादित करणारी विभूती तिकडे होती.

असे एक ना अनेक चमत्कार श्री बाबांनी दाखविले. सर्वांविषयी माहिती देण्याचे सामर्थ्य माझ्या या लेखणीत नाही. नागपूर जवळच काही मैल अंतरावर असणाऱ्या वाकी येथे श्री बाबा तेथील काशिनाथ पाटलांच्या आग्रहास्तव गेले. ती जागा त्यांना इतकी आवडली की एका आम्रवृक्षालाच त्यांनी "दवाखाना" हे टोपण नाव दिले. अद्यापही अनेक असाध्य रोग या वृक्षाच्या छायेत काही काळ राहिल्याने व तेथील थोड्या मातीच्या सेवनाने बरे होत असतात. या वर्तमान काळातसुद्धा अनेक भक्त तिथे गोळा होतात.

अशा या महान संताने जवळ जवळ सहा महिने अगोदरच देहत्याग करण्याचा इशारा दिला होता. अनेक श्रेष्ठ तज्ञांद्वारे वैद्यकीय उपचारांना सुद्धा श्री बाबांच्या या इशाऱ्यापुढे नमावे लागले. शेवटी १७ ऑगस्ट १९२५ रोजी सोमवारी श्रीबाबांनी देहत्याग केला.

त्यांची महासमाधी नागपूरच्या ताजाबाग शरीफला असून नेमलेल्या संस्थानद्वारे सर्व कार्य सुचारूपणे चालते. रघुजीनगर येथील त्यांच्या निवास स्थानी आणि वाकी शरीफला देखिल पूजाअर्चा व्यवस्थितपणे होते. या ठिकाणी नियमितपणे दरवर्षी उरूस वगैरेचा उत्सव मोठ्या उत्साहाने पार पाडण्यात येतो.

# अर्वाचीन भक्तलीलामृत

● श्री. अनंत काणे, पणजी

**अध्याय ५७ विषय : आत्मज्ञान [लेखांक शेवटचा]**

एका पौषमासात वनुसंक्रमणाच्या अवसरी श्रीसाई समर्थांचे अनेक भक्त तद्दर्शनार्थ जमले असताना भक्त चांदोरकरांनी आपले कर त्रिवार जोडून श्री बाबांस विचारले की आम्ही जो एक प्रश्न मागे केला होता त्याचे उत्तर अद्याप आपण दिले नाही. आमचेवर असा राग कां? तरी कृपया 'परमेश्वर' हा कोण, कसा व कोठे असतो ते आम्हाला सांगा. त्यावर महाराज म्हणाले, तुम्ही सारी माझी मुले, तुमच्यावर मी का रागवेन? तुम्हाला माझ्यावर रागावता येईल, जसे मला पण एक स्थान होते-श्री व्यंकुशहांच्या रुपाने. असो.

आता तुमच्या प्रश्नाकडे वळू. पण त्याआधी मागील दोन अध्यायात मी जे काही तुम्हाला सांगितले त्याचे जरा स्मरण करून देतो. त्या दोन अध्यायात मी जे काही (ज्ञान) सांगितले ते जर तुम्ही आचरणात आणलेत तर तुमच्या अंगात साधनचतुष्टचसंपन्नता येईल. आणि जेव्हा शिष्य साधन चतुष्टचसंपन्न होतो तेव्हाच त्याला ब्रम्हज्ञान–ग्रहणाचा अधिकार प्राप्त होतो व त्याचा उद्धार होतो.

सिद्ध लोक आपले साध्य साधण्यासाठी जे जे उपाय योजतात, त्यांना साधन असे म्हणतात. अशी साधने चार आहेत. त्यांची नावे क्रमवार सांगतो. लक्ष देऊन ऐका कारण विषय जरा गहन आहे. पहिले साधन 'नित्यानित्यविवेक,' दुसरे 'वैराग्य,' तिसरे 'शमदमादि षटक' (शम, दम, तितिक्षा, उपरति, श्रद्धा व समाधान) आणि चौथे 'मुमुक्षुता'.

नित्यानित्यविवेक म्हणजे 'ब्रम्ह सत्य जग मिथ्या' अशी मनीची भावना होणे. काही दांभिक लोक 'नित्यानित्यविवेक' हा आपल्या अंगी पूर्णतया बाण-लेला आहे हे दाखविण्यासाठी नाना खटपटी करतात. कोणी वारकरी होऊन पंढरपुरास खेपा घालतात पण त्यांच्यापैकी एकालाही ईश्वर (हरि) हा कोण, कसा आहे, कोठे आहे हे माहित नसते. वारी करतात तीसुद्धा श्रद्धा आहे म्हणून नव्हे तर जनात मान मिळावा ह्या हेतूने. ते नाना ग्रंथांचे भाराभार पाठांतर करतात, दुसऱ्याला उपदेश करतात पण त्यांचे स्वतःचे अंतर मात्र मुळीसुद्धा शुद्ध नसते, जणु ज्ञानरूपी सरोवरातले दर्दुरच – जे वादरूपी चिख-लाचे सेवन करून मकरंद बाजूस टाकतात. थोडक्यात ज्यांच्या मुखी परनिंदा,

जे आपलीच शेखी मिरवितात, ते विवेकी नसल्याने ब्रम्हज्ञानाला अयोग्य असतात. याउलट, ज्या कोणाला इहपरलोकीच्या विषयांची आशा उरली नसेल त्यांच्या अंगी "वैराग्य" पूर्णतया बाणलेले आहे, असे समजावे.

आता तिसरे साधन शमदमादि षटक. वर सांगितल्याप्रमाणे शम, दम, तितिक्षा, उपरति, श्रद्धा व समाधान हे याचे षटक. यांची व्याख्या थोडक्यात खालीलप्रमाणे करता येईल. विषयाच्या ठायी मनोनिग्रह याचे नाव शम. विषयावर वासना गेली असता मनाला आवरणे याचे नाव दम. प्रारब्धानुसार दुःख प्राप्त झाले तर ते विनाआक्रोश सहन करणे याचे नाव तितिक्षा. मायाजाळात चित्त न गुंतविता, कनक, कांता, सुत व आप्त हे मिथ्याभूत मानणे याचे नाव उपरति. विश्वासयुक्त मन असणे याचे नाव श्रद्धा. सुखदुःख समान मानणे, अंतरात न तळमळता चित्त शैलापरि (खडकाप्रमाणे) स्थिर करणे याचे नाव समाधान.

चौथे साधन 'मुमुक्षुता'. बळकट मोक्षइच्छा मनात धरून, त्या व्यतिरिक्त जे काही असेल त्याचा वीट मानून जो अपरोक्षज्ञानाची वाट हुडकीत असतो, त्याला मुमुक्षु असे म्हणावे.

इतके सांगून झाल्यावर मोक्ष म्हणजे काय हे थोडक्यात सांगतो. मोक्ष म्हणजे ना वैकुंठ ना कैलासपेठ. जगाचे जे आदिकारण, ज्यालाच 'अविनाशि शुद्ध चैतन्य' असे म्हणतात. त्या वस्तूशी तादात्म्य होणे याचेच नाव मोक्ष. अशा या अविनाशि मोक्षपदास जाणे हाच खरा पुरुषार्थ. इतर सगळे काही फोल आहे.

हे श्री साई समर्थांचे बोल ऐकून चांदोरकर कर जोडून म्हणाले, बाबा, ते शुद्ध चैतन्य कसे असते? यावर उत्तरादाखल बाबा म्हणाले, जे जगाचे जगदाकार आहे, जे सगळे चराचर व्यापून उरले आहे आणि ज्याच्याच ठायी जगताचा लय होणार आहे असे जे आद्यमूळ आहे तेच सोज्वळ चैतन्य आहे हे जाण. जगत जे आपणास दिसते आहे (दृश्य जगत) तो भास आहे. आता हे चैतन्य कसे आहे हे निश्चयात्मक रितीने सांगवत नाही. पण ते आहे याची साक्ष क्षणोक्षणी येत असते. जगात असे एकही स्थान नाही, एकही वस्तू नाही, ज्या ठिकाणी त्या सर्वव्यापक चैतन्याचे अस्तित्व नाही. वस्तुनिर्देश होण्यासाठी त्याला चैतन्य असे म्हणावयाचे. बाकी त्याला नाम, रूप काही नाही; जसा हा प्रभंजन (वारा) रंगरूपातीत असतो तसेच हे चैतन्य आहे हे विसरू नकोस. ज्ञाते लोक या चैतन्याला 'ब्रम्ह' असे म्हणतात, त्याची उपासना करतात, आणि अशा या उपासकांना 'ब्रम्हवेत्ते' म्हणतात. सगळ्या वृक्षकोटी, प्राणि-

कोटी, जीवकोटी, जंतूकोटी ह्या एका चैतन्याचा पोटी सामावलेल्या असतात. दृश्य, ज्ञेय, भासमान असे जे काही आहे, त्या सगळ्यांचे आद्यकारण एक चैतन्यच आहे. ते चैतन्य सर्वव्यापक, क्लेशरहित, सत्यज्ञानरूप असून आनंदरूपही आहे आणि लक्षात ठेव, आपण सगळे त्यापासून भिन्न नाही आहोत. अशा या चैतन्याला ब्रम्ह असे म्हणावे.

हे ऐकून चांदोरकर हात जोडून म्हणाले, हे सद्‌गुरुनाथा, आपण म्हणता ब्रम्ह हे सर्वव्यापक, क्लेशरहित, आनंदरूप असते व तेंच ब्रम्ह सर्वाठायीं नटले आहे असेही म्हणता तेव्हा मला येथे एक शंका येते तिचे कृपया निरसन करा. जग हे सगळे क्लेशयुक्त आहे, तसेच अनंत पण, आहे त्यात चैतन्याचे कसलेही गुण प्रत्ययाला येत नाहींत. जो जन्मापासून अंध असतो तो जसा लावण्य पाहू शकणार नाही, तसेच सत्य चैतन्य मिथ्यामाजी कसे राहू शकेल? आता आत्म्यालाच जर आपण चैतन्य असे लेखिले तर त्याचे एकत्व नष्ट होईल का की आत्मे हे अनेक आहेत. एका आत्म्याच्या सुखदुःखाचे भान दुसऱ्याला होत नाही मग सगळ्यात एकच चैतन्य आहे असे कसे म्हणता येईल? ज्याप्रमाणे शरीरे ही भिन्न भिन्न असतात त्याचप्रमाणे आत्मेही भिन्न भिन्न असतात, तेव्हा आत्मा हा चैतन्यापासून निराळा असावा असे वाटते. हे ऐकून श्रीसाईनाथ म्हणाले, नाना, तू येथेच चुकतोस. आता चित्त स्थिर करून मी काय सांगतो ते ऐक. असे पहा, तांबडा, शुभ्र, काळा, निळा–पिवळा मिश्र रंग, किरमिजी, हिरवा, जांभळा, असे निरनिराळे रंग वेगवेगळे पाण्यात टाकले आणि त्यांचे पेले भरून वेगवेगळाले ठेवले तर त्यामुळे मूळ उदक निरनिराळे होते का? ज्यात ताम्र रंग टाकला ते उदक तांबडे झाले, पिवळ्या संगे उदकाला पीतपणा आला, असे नाना रंग उदकाला आले. मग ते उदक घेऊन जर त्याचे पृथक्करण केले तर त्याचे पिवळेपण, हिरवेपण नष्ट होऊन ते स्वच्छ उदकच राहील. त्याचप्रमाणे आत्मा–हृदय ही एक झाल्याने सुख–दुःखे प्रतीतीस येतात. जरी हृदये अनेक असली तरी सगळ्या हृदयात आत्मा हा एकच एक सत्य असतो. सुख–दुःखे ही हृदयाचा धर्म असतात. परंतु हृदयास हृदयपण येण्यास आत्म्याची जरूरी असते. म्हणून आत्मा हेच चैतन्य याची जाणीव ठेव. या विषयाची तुम्हांला अधिक समज पडावी व अधिक फोड व्हावी म्हणून मी सांगतो ते ऐक. चैतन्य हे त्रिगुणात्मक आहे. पारमार्थिक, व्यावहारिक आणि प्रातिभासिक. ज्याप्रमाणे एकच एक देह हा तीन अवस्था भोगितो – वृद्धत्व, तारुण्य व बालपण – तसाच हा प्रकार आहे. ज्या आत्म्याला पारमार्थिक चैतन्याची योग्यता आली त्याची गणना साधूत होते. जे त्याज्य–अत्याज्य जाणून

शास्त्रशुद्ध वर्तन करतात त्या आत्म्याला व्यावहारिक म्हणावे. जे असत्याला सत्य मानतात, जे अज्ञानपटलाने झाकले गेले असतात, अशा आत्म्यांना प्रातिभासिक म्हणावे. प्रातिभासीक ते अज्ञान, व्यावहारिक हे सज्जन, पारमार्थिक हे संत जरी असले तरी ह्या सगळ्यांस कारण आत्माच असतो, आणि असे पहा, राजा, त्याचे अधिकारी व त्याचे दूत ह्यांच्यात भिन्नत्व असले तरी सर्वांस एकत्र आणणारी राजसत्ता हे एकच सत्य कारण असते. राजाला बसावयाला सिंहासन असते, हत्ती, पालखी व इतर याने (वहाने) त्याच्या हालचालीसाठी जय्यत तयार असतात व राजा आपल्या इच्छेनुसार सगळ्यांना राबवितो. राजाज्ञेस अनुसरून अधिकारी वर्ग वागतो व त्यांच्या इच्छा–आकांक्षा राजावरच अवलंबून असतात. राज–दूत हे राजाज्ञेची बजावणी करतात व त्यांच्या इच्छेची गती इथेच कुंठित होते. याप्रमाणे, ही सगळी रयत राजसत्तेच्या आवरणात वागते. कारण या सगळ्यास एकत्र आणणारा राजसत्ता हा एकच दुवा असतो. राजेपण, सचिवपण, दूतपण, रयतपण हीं सगळी जरी राजसत्तेवर अवलंबून असली तरी राजसत्ता ही ह्या सगळ्यांहून भिन्न असते. राजा मरण पावला तरी राजसत्ता नष्ट होत नाही, यावरून राजसत्ता ही राजाहून भिन्न आहे हे उघड आहे. जो राजसत्तेशी तादात्म्य होतो, त्याला निश्चितपणे राजेपण लाभते व ही गोष्ट न्याय्य अशीच आहे. राजसत्ता ही सर्वथा अविक्रिय आहे. पण तिच्या आधारावर सगळे काही घडत असते. श्रीसाईबाबा पुढे म्हणाले, नाना, तू जो गादीवर बसतोस तो राजसत्तेच्या जोरावर; तुझा शिपाई जो तुझ्यावर पंखा वारित असतो तोही राजसत्तेच्या अनुषंगाने, कारण तुम्ही दोघांनी एकत्र आणणारे 'राजसत्ता' हे एकच कारण आहे. पूर्ण राजसत्तेच्या अनुभव राजा घेत असतो तर तिच्या काही अंशांचा अनुभव अधिकारी वर्ग घेत असतो. राजा घेत असतो तर तिच्या काही अंशांचा अनुभव अधिकारी वर्ग घेत असतो. त्याहीपेक्षा कमी अंश शिपायास लाभलेला असतो तर रयत ही नुसती तिच्या आश्रयास राहून वर्तत असते. याच रितीने जे पारमार्थिक आत्मे असतात, ते ते ब्रम्हाशी तादात्म्य पावत असल्याने त्यांना पूर्ण ब्रम्हसुख लाभते.

श्री साईबाबांचे वरील भाषण ऐकून भक्त चांदोरकर हात जोडून म्हणाले, बाबा, राजसत्ता ही निरवयव असल्याने तिचे अंश कसे पाडता येतील आणि जर, तसे अंश पाडता आले तर तिचे निरवयत्व नष्ट नाही का होणार? चांदोरकरांचा हा प्रश्न ऐकून बाबा म्हणाले, नाना, तू चांगला प्रश्न केलास व तो ऐकून माझ्या जीवाला समाधान झाले. राजसत्ता अभेद आहे हे खरे पण ती ज्याप्रमाणे विभागली गेलेली असते तोच न्याय अनंतरूप असे जे 'चैतन्य त्याच्या ठायी दिसून येतो. चैतन्यशक्तिचे अंश पडत नाहीत हे खरे पण जो

त्या शक्तिचें ग्रहण करतो त्याच्या शक्तिनुसार तिचे अंश पडणे क्रमप्राप्त आहे. उदा. घट, बोळके, रांजण, डेरा, गेळा, माथणी या सगळ्यात आकाश भरून राहिले आहे पण जेवढे आकाश नदींत त्याहून कमी रांजणात, त्यापेक्षां किंचित कमी घटात, आणि गेळ्या-बोळक्यामध्ये तर त्याहूनही कमी. पण यावरून आकाशाचे भाग पडले असे म्हणता येईल का ? नाना, हीच स्थिती आत्म्याची आहे. हे जे जग दिसत आहे तो मायेचा खेळ आहे. माया-ब्रम्ह एकचित्त होऊन ब्रम्हांड रचिलें गेलें यावर चांदोरकर म्हणाले, श्रीसाईसमर्था, ही माया कोण, कधी व कोणी हिला निर्माण केली व ती आहे कशी ? आपण म्हणालात, चैतन्य हे जगाचे आद्य कारण आहे व जग हे त्याहून भिन्न नाही. जर असे आहे तर ही माया आली कोठून ? महाराज म्हणाले, माया कोठून उदेली ते सांगतो. मी चैतन्यासंबंधी बोललो ना, त्या चैतन्याची, जी शक्ती तीच ही माया, तीनेच या चैतन्याला दृश्यरूप दिले. त्यांना एकमेकापासून बेगळे करणे केवळ अशक्य आहे. उदा. गुळ व त्याची गोडी, सूर्य व त्याची प्रभा हीं जशीं पृथक करता येत नाहीत तीच स्थिती ब्रम्ह आणि मायेची आहे. सूर्य आणि प्रभा असे वेगवेगळे शब्द आपण वापरत असलो तरी प्रत्यक्षात प्रभा आणि सूर्य मिळूनच सूर्य आकाराला येत असतो. सूर्याच्या प्रभेवरून जसें आपल्याला सूर्याचे ज्ञान होते तोच प्रकार माया-ब्रम्हाच्या बाबतीत घडतो. पण मायेला अंत असतो तर ब्रम्ह हे अंतातीत असते. तथापि दोहोंचेही अनादित्व मात्र कायम असतें. माया हीलाच प्रकृति तर चैतन्याला पुरुष अशी संज्ञा आहे. आणि या दोहोंपासूनच जगाची उत्पत्ति झालेली आहे. प्रकृति-पुरुष संबंधीचे विवरण श्री ज्ञानराजाने आपल्या 'अमृतानुभव' या ग्रंथात केले आहेच म्हणून मी त्याची पुनरुक्ति आता करीत नाही. फक्त त्या आत्मज्ञानगुहेची तुम्हा सर्वांना ओळख करून देतो. जे जे त्या गुहेत गेले ते केव्हांच परत आले नाहींत. ते गुहाच होऊन आनंदाने राहिले. पुरुष हा अवघ्यांचा 'कारण' तर माया हें 'कार्य'. अशा त्या मायेचें महिमान, बाबा चांदोरकरा अगाध आहे. मी गोम्या, तिम्या, अमका, तिमका आहे असे जे आपणाला वाटते तो भास, जरी का असत्य, मायेच्या योगाने होत असतो. जे आहे ते झाकणे व जे नाही ते भासविणे ह्या मायेच्या गुणामुळे जीव भ्रमित होऊन जातो. एका मजूराला स्वप्न पडले की, आपण राजा झालो, एथे झाले काय, तर मायेने त्याचे मजूरपण झाकले आणि नसलेले राजेपण त्याला भासविले. अगदी याच-प्रमाणे माया ब्रम्हास झाकून टाकते व आपले अस्तित्व प्रगट करते. वस्तुत: जग हे सत्य नसून चैतन्य हेच सत्य असते पण मायेच्या प्रभावामुळें आम्हाला उलटा अनुभव येतो. जगात जे जे विषय आपल्या अनुभवास येतात ते असत्य

असूनसुद्धा सत्य आहेत असे वाटतात व आपले अकल्याण करतात. यासाठी नाना, हा जो ज्ञानोपदेश मी केला तो पक्का अंतःकरणात स्थिर कर व मायेचे आवरण काढून टाक. म्हणजे तुला दिसून येईल की तूच शुद्ध चैतन्य आहेस. पाण्याचे गढूळपण गेल्यावर जसें शुद्ध पाणी नजरेस येते तसे मायेचे गढूळपण काढले गेल्यावर शुद्ध चैतन्याचा तुला स्वतःला अनुभव येईल. सद्वस्तूची तुम्ही सगळ्यांनी उपासना करावी. हेच माझे तुम्हाला सांगणे आहे. आत्मा हीच ती सदवस्तु हे प्रत्येकाच्या प्रत्ययास आणणे हाच अध्यात्माचा हेतू आहे. प्रत्येकाने आपण स्वतः आत्मा असल्याचा अनुभव घ्यावा व याचजन्मी मुक्त व्हावे.

बाबांनी सांगितलेले हे ब्रम्हज्ञानपर विचार ऐकून सगळे आनंदभरित झाले व त्यांनी श्रीसमर्थांच्या चरणांवर लोटांगणे घातली. त्यांना अनलक्षून बाबा म्हणाले, वत्सानो, हा ज्ञानामृताचा ठेवा सदा मनात जागृत ठेवा. यावर शिष्य-वृंदाने एकसुरात म्हटले – तथास्तु – [ समाप्त ]

# श्रीसाईलीला-लेखक कवी संमेलन-दुसरे

श्रीसाईलीलाच्या लेखक-कवींचे दुसरे स्नेहसंमेलन शिर्डीस फेब्रुवारी १९७६ च्या तिसऱ्या आठवड्यात भरविण्याचे योजलेले आहे. या संमेल-नाची निश्चित व सर्वांच्या सोयीची अशी तारीख जानेवारी १९७६ च्या अंकात जाहिर केली जाईल. गतवर्षी प्रमाणे बॉम्बेसेंट्रल वरुन दुपारी १२ वा. शिर्डीस सुटणाऱ्या बसमध्ये काही राखीव जागा ठेवण्यात येतील.

–या स्नेहसंमेलनात श्रीसाईलीलेमधून शंभरावर लेख लिहिलेले ठाण्याचे वयोवृद्ध साईभक्त **श्री. द. शं. टिपणीस** यांचा खास सत्कार केला जाईल.

–तसेच याप्रसंगी श्रीसाईबाबांच्या प्रत्यक्ष सहवासात आलेल्या, त्यांचा सहवास लाभलेल्या म्हणजे आज सुमारे सत्तरी ओलांडलेल्या मराठी भाषी श्रीसाईभक्तांचाही सत्कार केला जाणार आहे. तेव्हा ज्या साईभक्तांचे आज वय ७० वर्षावर आहे व जे प्रत्यक्ष श्री साईबाबांच्या सहवासात आनंदले रमले होते अशांनीच आपली नावे–पत्ते मुंबई कार्यालयाकडे पाठवावेत म्हणजे रीतसर निमंत्रणे त्यांना पाठविली जातील.

–का. संपादक.

# कळाच अमुची न्यारी

• द. शं. टिपणीस, ठाणे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. इतरही संत होऊन गेले. संत व अध्यात्म यांचा संबंध अजोड आहे यात नवल वाटण्यासारखे विशेष काही नाही. पण संत व क्रांति यांचे साहचर्य असणे विशेष आहे, हे विशेष महाराष्ट्रीय संतांच्या ठिकाणी आढळून येते. महाराष्ट्रातील महासंतांनी अध्यात्मातील रूढी, रिति रिवाज, समजूती, कोणा एका वर्गाच्या अध्यात्मिक ज्ञानावर असलेला मालकी हक्क, या गोष्टींना धक्का दिला आहे. गीतेवर भाष्य करून विशिष्ट वर्गाच्या हक्काचे असलेले ज्ञान मराठीत आणून ते सर्व मराठी भाषिकांना श्रीज्ञानदेवाने उपलब्ध करून दिले व ते समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवण्याची वाट मोकळी करून दिली. दक्षिणेचा ठेवा उत्तरेकडे नेऊन व उत्तरेचा ठेवा दक्षिणेकडे आणून दक्षिण व उत्तर यांच्यात अध्यात्मिक एकात्मतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला तो नामदेवाने, श्री एकनाथाने भागवतातील एकादश स्कंदातील उद्धवगीता मराठीत आणून मराठी लिहिता वाचता येणाऱ्यांना अध्यात्मिक ज्ञान खुले करून दिले व विरोधकांना खडसावून विचारले की संस्कृत देवे केली मग मराठी काय चोरे केली? श्री संत तुकारामाने तर अध्यात्मिक ढोंगा सोंगावर फटकारे ओढून सर्वसाधारण जनतेला खरा अध्यात्म कोणता हे दाखवून दिले. आजच्या भाषेत सांगायचे तर, तुकारामाने जहाल क्रांतिकारी पक्ष स्विकारला होता हे त्याच्या अभंगातील भाषेवरून दिसून येईल. त्या वेळच्या सर्व संतांमुळे अध्यात्माची गंगा मराठी प्रांतातून खळखळ वाहू लागली ती आजतागायतही पुढे पुढे जात आहे. श्रीसमर्थ रामदासस्वामींनी आणखी एक पाऊल टाकले. अध्यात्म राजवाड्यात नेऊन राजकारणाला व व्यवहाराला त्यांनी अध्यात्माची बैठक दिली. मानसिक बलाबरोबर शारिरीक बल कमावणे जरूर आहे म्हणून त्यांनी बलोपासना सुरु करून नेटका प्रपंच करा, पराक्रम करा, पुरुषार्थ गाजवा व शंभर वर्षे जगा हा उपनिषदाचा मंत्र घरोघरी पोहोचवला. यानंतर तिसरे महत्वाचे पाऊल मानवतेच्या दृष्टीने टाकले ते शिर्डीच्या श्रीसाईबाबांनी,, आपल्या रोजच्या आचारा विचारात मानवता का व कशी उतरवावी याचे मार्गदर्शन त्यांनी केले. यासाठी अध्यात्मात ज्या क्रांतिकारक गोष्टी त्यांनी केल्या त्यांचा जोश इतका होता की, त्यांचे ठसे जनमानसावर अजूनही उमटून राहिले आहेत. धर्माचे सर्वश्रेष्ठ ध्येय जे परमात्म्याशी एकात्मतता, मानवता त्यास वाट मोकळी करून देणे

हे आहे. त्या धर्माची जाणीव जनतेला करून देण्याचे व्रत घेऊन साईबाबा शिर्डीत आले. या ध्येयाला जे जे विघातक ठरणारे असेल त्यांची काटछाट बेधडकपणे त्यांनी केली. आजपर्यंत झालेल्या संतात कमीत कमी बोलणारे, अबोल असे संत म्हणजे साईबाबा, कमीत कमी बोलणं व जास्तीत जास्त कृति करण हे त्यांचे ब्रीद होते. नव्हे आजही आहे. अशा या साईबाबांनी अध्यात्मात कोणकोणत्या क्रांतिकारी सुधारणा केल्या त्याचे दिग्दर्शन येथे थोडक्यात करावयाचे आहे.

मानवतेचे बीज हृदयाहृदयात पेरून वैयक्तिक उन्नति साधणे व मानवतेची सुंदर, मोहक, गोंडस, कोमल, गोड फुले फुलविणे व तद्वारा अंती मानवतेची जागतीक बाग निर्माण करून जगात शांति प्रस्थापित करणे हे बाबांचे जीवीत कार्य होय. कोणी कोणत्याही अध्यात्मिक मार्गाने आपल्या जीवनाची वाटचाल करावी. परंतु त्याचे तोंड सदैव मानवतेच्या दिशेला राहिले पाहिजे. हा त्यांचा कटाक्ष होता. महाराष्ट्रात कितीतरी संत होऊन गेले व त्यांनी जीवाचे रान करून जनतेला उपदेश केला पण त्यांच्यानंतर पुन्हा लोक कोरडे ते कोरडेच राहत आले असं कां? अध्यात्मिक शिक्षणात कुठेतरी काहीतरी चुकतय, खटकतेय हे काहीतरी काय हे बाबांनी अचूक हेरले होते. मानवता हा शब्द आज घरोघरी ऐकू येतो. जगातील बडी बडी राष्ट्रे आज तिचा निदान जप तरी करीत आहेत. पण बाबा आले, विश्वशक्तीने रूप धारण केले त्या काळी जनतेच्या राहूद्याच पण त्या वेळच्या बड्या बड्या मुत्सद्यांच्या तोंडी हा शब्द चुकनही येत नसे, मानवतेचा मूळ झरा जरी भारतात उगम पावला असला तरी तो कित्येक शतके परिस्थितीच्या दगडधोंड्यांनी बुजला होता. बाबांना तो पुन्हा चालू करावयाचा होता. बाबांची दूरदृष्टी इतकी पल्लेदार होती की पुढे भविष्यात येणारी परिस्थिती ते जाणून होते. वास्तव परिस्थितीशी जमवून घेणारा, मानवतेची व वैयक्तिक अध्यात्मिक उन्नति साधणारा असा नवीन अध्यात्मिक शैक्षणिक आकृतिबंध त्यांनी अमलात आणला. जुन्या आकृतिबंधातील ज्या ज्या गोष्टी या नवीन आकृतिबंधाला बाधक ठरतील त्या सर्व प्रथम बाजूला करणे आवश्यक होते. ते त्यांनी प्रथम केले. बाबा शिर्डीला आले ते मुळातच या अडथळ्यांचा बंदोबस्त करून. हे अडथळे वा मानवतेचे मारेकरी कोणते?

गुरुची गादी असते. शिष्य परंपरा असते. पट्ट शिष्य असतो. गुरुनंतर पट्ट शिष्यच बहुतेक वारसदार होतो. हे अध्यात्मातील चालत आलेले संकेत गुरु परंपरा चालत राहावी म्हणून ही व्यवस्था. अशा परंपरा ठिकठिकाणी निर्माण होतात. या संकेता मागील हेतू स्तुत्य असला तरी प्रत्यक्षात पुढे पुढे

परंपरेचा हळूहळू गट होतो. मग गटबाजी व आपापसात स्पर्धा, संघर्ष, भांडण, तंटे, निरनिराळ्या गुरुंच्या शिष्यांचा पंथ तयार होऊन ते एकमेकांवर गुरगुरत राहतात. गुरुने काही माया ठेवली असली तर त्याचे शिष्य हक्कासाठी तंटत बसतात व वेळ, प्रसंगी कोर्ट दरबारही करतात. एकाच गुरुचे शिष्य अमूक आवडता तमुक नावडता असे नंबर लावतात, यामुळे द्वेश मत्सर निर्माण होतो. काहीवेळा गुरु एकादया शिष्यावर अधिक प्रेम करतो. गुरु असं का करतात हे अज्ञानी शिष्यांना समजत नाही. आई आपल्या अपंग अगर सालस सद्‌गुणी मुलावर इतर मुलांपेक्षा अधिक प्रेम नाही कां करीत? गुरुच्या ठायी असलेल्या या मातृवात्सल्याची कल्पना कोवळ्या शिष्यांना कशी व्हावी? मग गुरुपक्षपात करतात,- उजवे डावे करतात असा त्यांचा गैरसमज होतो. अशी मालिका तयार झाली की सद्‌गुरू नंतर भांडण तंटयाखेरीज अगर निराळं बिऱ्हाड मांडण्या खेरीज दुसरं काही पदरी पडत नाही. व त्यामुळे मानवतेला धक्का लागून खरा अध्यात्म झाकाळला जातो. सगळं मुसळ केरात जाऊन गाडी पूर्वपदावर येते. खुद्द बाबांच्या हयातीत बाबा उजवं डावं करतात अशा शंका त्यांच्या उत्तमोत्तम शिष्यांनाही आल्या असे दर्शविणाऱ्या घटना श्री साईचरित्रात आहेत. विस्तार भयास्तव त्या सर्व येथे देता येत नाहीत. वानगी दाखल पहा. पंडिताचे गंध लेपन, माझी सेवा ४० वर्षांची व साठ्यांची सात दिवसांची. त्यांना फळ, त्यांच्यावर अनुग्रह. माझ्यावर नाही. असं कां? ही दाभोळकरांची शंका. असल्या घटनांवरून समजून येईल की बाबांनी वरील संकेतांना स्पर्शसुद्धा का केला नाही. असे असूनही बाबांच्या भक्तिची भागीरथी आजही झुळझुळ वाहत असून तिचे कार्य चालू आहे. ही एकच गोष्ट खर तर बाबांचे क्रांतिकारित्व दाखवण्यास पुरी आहे. कानमंत्र देणे, कान फुंकणे, त्याची गुप्तता ठेवणे यामुळे शिष्यात गैरसमज संशय उत्पन्न होतात. या गोष्टी आपल्या कार्याला विघातक आहेत हे जाणून बाबांनी आपल्या पुरत्या त्या दूर ठेवल्या कोणालाही उपदेश करावयाचा तो चारचौघादेखत मोजक्या शब्दात करावयाचा असा त्यांचा बाणा होता व आजही आहे.

मानवतेची वाढ खुरटून टाकणारी दुसरी गोष्ट म्हणजे धर्म, जात, पंथ, पक्ष. बाबांनी स्वच्छ सांगितले आहे की तुम्हा आम्हां मधली 'तेल्याची भित' (भेदाभेद करणारी बुद्धि) पाडून टाका. धर्म ( religion ) हा एकात्मता द्वारे माणुसकीची मानवतेची वाढ करण्यासाठी असताना लोकांनी मात्र त्याचा निरनिराळ्या धर्मीयात द्वेष मत्सर उत्पन्न करण्यासाठी केला. आपल्या केवळ आपल्याच धर्माच्या वर्चस्वासाठी लढाया झाल्या, रक्ताचे पाट वाहिले व मानवता धुळीला मिळाली याची उदाहरणे इतिहासात भरपूर आहेत. अशा-

वेळी देवा ऐवजी सैतान मनात थैमान घालीत असतो. मानव पूर्वीपेक्षा अधिक सुसंस्कृत झाला असला तरी ही वर्चस्वाची वृत्ति मनातून दबा धरुन बसलेली आजही आढळून येते. हे सर्व लक्षात घेऊन सर्व धर्मांना मान्य असलेली एकात्मता व तीमुळे निर्माण होणारी मानवता यांचा प्रचार साईबाबांनी आयुष्यभर केला. जे धर्मामुळे होते तेच पंथामुळे होते. म्हणून या सर्वांना साईबाबांनी मशिदीची पायरी चढू दिली नाही. एवढेच नव्हे तर आपला धर्म, जात, कुळ वाडवडील यांचा कुणालाही थांगपत्ता लागू दिला नाही. या भांडणतंटयावर उपाय म्हणून राम-रहीम एकच, अल्ला मालीक या शांतिमंत्राचा जप केला. याबाबतीत कुणी काही म्हणा कुणी काही म्हणा अशी वृत्ति त्यांनी धारण केली. पारशी व हिंदु यांचे एकिकरण दाखवणारा अग्नि मशिदीत प्रज्वलित केला. हिंदूंची त्याग मूर्ति तुळस मशिदीत आणली. मशिदीला द्वारकामाई असं नाव दिलं. वेदोक्त मंत्र व कलमे या दोघानांही मशिदीत आणले. त्यांच्याकडे येणाऱ्यांची जात, धर्म, नाव वगैरे चौकशी त्यांनी कधीही केली नाहीं. (त्यांना सर्व काही माहित असे हा भाग निराळा) तुम्ही कुणीही असा, कुठेही असा सांगतो तेवढे करा एवढेच बाबांचे मागणे असे. कीर्तन, प्रवचन, गावोगावी प्रचार या साधनांचा वापर त्यांनी केला नाहीं. असं आपण करणं म्हणजे टिकाकारांना खाद्य देऊन भांडण तंटयासाठी त्यांना उत्तेजन देणे होय व असे झाले तर गाडी पूर्वपदावर येईल. बाबा फारच मोठे मानसशास्त्रज्ञ होते. त्यांना माहीत होते की माणूस अनुभवाने जेवढं शिकतो, उमेजतो तेवढं दुसरं कशानेही नाहीं. अनुभवा सारखा गुरु नाही. या अनुभव पद्धतिच उपयोग बाबांनी केला. मनचं मनीं समजावं, उमजावं व सन्मार्गाला लागावं ही त्यांची इच्छा. या अनुभवामुळे मनचे मनी पटल्यामुळे लोक बाबांच्या पायाशी जात. आजही जात आहेत. या पद्धतीत बलाबाली नाही की वादावादी नाही वा कोणत्याही धर्माचा अगर जातिपंथाचा प्रचार नाही. सरळ, शुद्ध व सरळ मार्ग.

हे विश्व, सजीव निर्जीव, त्यातील अणुपरमाणूसह सर्व एका सुंदर सूत्रात गोवले आहे. सर्वातून एकच एक शक्ति परमात्मा नांदत आहे. याची जाणीव मानवाला करुन देणे हा मुख्य हेतु फकिराच्या रूपाने अवतार घेण्यात त्या विश्वशक्तिचा होता. तुम्हाला वाटतं हा फकीर आहे पण खरं म्हणजे तो राम आहे, कृष्ण आहे, शिव आहे, हा अनुभव बाबांच्याकडे पाहिल्यावर अनेकाना आला आहे. सर्व दैवते, सर्व सद्गुरु एकच, त्यांची एकमेकांशी पूर्ण एकात्मतता असे हे पुंडलीकराव, कानडी अप्पा वगैरेंच्या उदाहरणावरुन त्यांनी आपल्या भक्तांना पटवून दिले आहे. या देहालाच लोक साईबाबा समजतात. पण

खरोखर मी कोण ? हे बाबा स्वताच सांगतात, औट हात हे परिमित । हेच मद्व्याप्तिजे मानित । त्यांस करावयास निभ्रांत । मूर्तिमंत मी झालो. ॥ अ. १९. आणि खरोखरच अनेकाना अनुभव देऊन बाबांनी लोकांचा हा भ्रम घालविला. हे सर्व वाचून असं नाही कां वाटत की बाबा हे एक क्रांतिकारी संत होते? त्यांच्यात शब्दात 'कळाच आमुची न्यारी' असे ते होते. ☆☆

## श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीची

### पूरग्रस्तांना एक लाखाची देणगी

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीतर्फे मराठवाडा, औरंगाबाद, नांदेड, परभणी इ. विभागातील पूरग्रस्तांना सहाय्य म्हणून, एक लाख रुपये रकमेचा चेक शिर्डी संस्थानचे सर्वाधिकारी व सिटी सिव्हिल जज्ज श्री. एन. सी. पारेख यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांना. दिनांक १७ सप्टेंबर १९७५ रोजी 'सह्याद्री' वर अर्पण केला. या प्रसंगी शिर्डीसंस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक हे पण हजर होते. श्रीसाईबाबा संस्थानतर्फे यंदाच्या वर्षी दिली गेलेली ही सर्वात मोठी देणगी होय.

## श्री साईलीला–दिवाळी अंक १९७५
## स्वानुभव विशेषांक

श्रीसाईलीला मासिकाचा पुढील अंक नोव्हेंबर-डिसेंबर जोडअंक म्हणून प्रसिद्ध करण्यात येत आहे. हा अंक स्वानुभव विशेषांक म्हणून प्रकाशित होत आहे. श्रीसाईबाबांचे असंख्य भक्त या जगात वावरत आहेत त्यांना वेळोवळी श्रीबाबां बद्दलचे अनुभव व दृष्टांत पडताळे आलेले आहेत. श्रीसाईभक्तांनी पाठविलेल्या या अनुभवांचे लेख या अंकात प्रसिद्ध होत असल्याने, या अंकाला एक विशेष स्वरूप आलेले आहे. या अंकाची पाने सुमारे १०० असून, मुखपृष्ठावर बाबांचे रंगीत संग्राह्य छायाचित्र आहे. या खास अंकाची किंमत सव्वारुपया असून, वर्गणीदाराना नेहमीच्याच वर्गणीत हा अंक लाभणार आहे.

श्रीसाईभक्तांनो, आपण अद्याप श्रीसाईलीलेचे वर्गणीदार झाला नसाल तर आजच आपली वार्षिक वर्गणी रु. ६ पाठवून त्वरीत वर्गणीदार व्हा.

# ईश्वराचे अस्तित्व

• बाळकृष्ण धामणकर

ईश्वराचे अस्तित्व हा काही आता वादाचा विषय राहिलेला नाही. जग-भरच्या शास्त्रज्ञांनी, वैज्ञानिकांनी, संशोधकांनी आणि थोर थोर अशा विचार-वंतांनी ईश्वराच्या अस्तित्वाला मान्यता दिली आहे. नास्तिकांनासुद्धा अशी मान्यता का द्यावी लागली? ईश्वराच्या अस्तित्वाचे असे भक्कम पुरावे तरी कोणते? असे जे काहीं पुरावे आधारस्तंभाप्रमाणे आहेत, त्यापैकी काही पुरावे येथे सूत्ररूपाने सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) प्रत्येकजण स्वतःबद्दल बोलताना, अगदी दुराग्रही नास्तिकसुद्धा, 'मी आहे' असेच ठासून सांगत असतो. हा 'मी' कोण ? 'मी' आहे असे म्हणणे हाच एक ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

(२) अनुमान, आप्तवाक्य, अनुभव आणि श्रद्धा या चतुर्विध आधारावर ईश्वराचे अस्तित्व निर्विवादपणे सिद्ध करता येते.

(३) अहं ब्रम्हास्मि, तत्वमसि, नेति नेति, सर्व खलु इदं ब्रम्ह, ही जी महावाक्ये आहेत ती एकमेकाला पूरक आणि पुष्टिदायक आहेत. सर्वांचा भावार्थ, गूढार्थ, आणि तात्पर्यार्थ एकच आहे. तो म्हणजे ईश्वरी सत्तेचे अस्तित्व.

(४) विश्वातील अनेक कार्यकारण परंपरांच्या मागे केवळ एकच तत्व आहे. ते कार्यही नाही व कारणही नाही. त्याच्याबद्दल बोलायचेच झाले तर येवढेच बोलता येते.

–ते आहे – या 'ते आहे' लाच ईश्वर म्हणतात.

(५) या सतत पालटणाऱ्या दृश्य व जड विश्वाच्या मागे कधीही न पालटणारी, इंद्रियांना गोचर न होणारी अशी एक शक्ती आहे. ती शक्ती म्हणजेच ईश्वर.

(६) इंद्रियगम्य जगापेक्षा अतींद्रिय जग बरेच विशाल आहे. एखादा हिमनग पाण्याच्या वर एकदशांश दिसतो. परंतु त्याचा नऊदशांश भाग पाण्यात बुडालेला असतो. या अतींद्रिय शक्तींचा जनक कोण? अर्थात परमेश्वर.

(७) परमेश्वर आणि निसर्ग यात फार मोठा फरक आहे. योजना कर-णारा तो परमेश्वर आणि योजनेप्रमाणे घडत राहणे हा निसर्ग. घड्याळ आणि घड्याळजी यात जो फरक आहे, तोच ईश्वर आणि निसर्ग यात आहे.

(८) या सर्व विश्वात सर्व प्रकारच्या परिस्थितीत अत्यंत एकतानता आहे. अगदी सृष्टीच्या जड भागात सुद्धा ही एकतानता निर्माण करणारा कोण ? अर्थात परमेश्वर.

(९) ईश्वर आहे पण तो कसा आहे हो–असे जर कोणी अडवून विचारील तर त्याला सांगावे लागेल की ईश्वर ईश्वरसारखाच आहे, आणि या उत्तरात गूढ, रहस्यमय, अविश्वासार्ह वाटण्यासारखे काय आहे? ज्याने साखर चाखलेलीच नाही त्याने जर प्रश्न केला की साखरेची गोडी कशी असते तर साखरेची गोडी साखरेसारखीच असेच नाही का आपण म्हणणार?

(१०) परमेश्वर अस्तित्वाच्या खाणाखुणा दाखवा असे जर कोणी आग्रहाने म्हणेल तर त्याला सांगावे लागेल, पाण्यातून लीलेने विहार करणारे मासे आणि हवेतून लीलेने संचार करणारे पक्षी यांच्या मार्गावरील खुणा मागे राहात नाहीत म्हणून त्यांचा संचार खोटा म्हणता येईल का?

प. पूज्य. विनोबांच्या विचारपोथीतील हे विचार पाहा :

(१) कोणी म्हणतात ईश्वर अज्ञेय आहे. जर अज्ञेय तर आहे कशावरून? जर आहे तर अज्ञेय कसा?

(२) देव आहे हे मी निश्चित मानतो. समोरचा दिवा आहेच अशी मी हमी देऊ शकत नाही.

(३) जर ईश्वराला दुसऱ्या एखाद्या वस्तूची उपमा देता आली तर तीच वस्तू ईश्वर का होणार नाही? कारागिराला चित्राची उपमा देऊन कसे चालेल?

(४) आई तू जे मला दिलेस ते दुसरे कोणीच दिले नाही. पण तू मेल्यावर जे देते आहेस ते तूही जिवंतपणी दिले नाहीस. आत्म्याच्या अमरत्वाचा एवढाच पुरावा मला बस्स आहे. आत्म्याचे अस्तित्व हाच ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

(५) विश्वात व्यवस्था आहे. रचना आहे. बुद्धी आहे. विश्वात व्यवस्था आणि बुद्धि आहे येवढे सांगितले म्हणजे ईश्वराची सिद्धी होते.

ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल गीतेमध्ये अनेक वचने आहेत. या अनेकांपैकी दोन तीनच येथे उद्‌धृत करतो –

(१) माझिया सत्तेने ।
जाहले हे पार्था ॥
परि मी सर्वथा ।
नाही केले ॥

(२) जेथूनिया विश्व
होतसे निर्माण
होते पुन्हा लीन
स्वरूपी ज्या.

(३) जागृती स्वप्न आणि सुषुप्ती
तिन्ही व्यापूनी समाधीही परती
ज्याची साक्षित्वे स्फुरे स्फूर्ती
तो जाण निश्चिती नारायण

# श्रीसाईनाथ

● र. श्री. पुजारी, पुणे

**५६ तात्याबाचीं मात्र धडगत नाही. दसऱ्याच्या दिवशी तो जाणार**

बाबांचे दर्शन घेऊन बाळा वाणी मशिदीतून बाहेर पडला. मान खाली घालून इकडे तिकडे न पाहाता सरळ चालू लागला. पेठेत आला. तेव्हा पेठेतील एका समवयस्क दुकानदाराने त्याला हाक मारली. काही तरी बोलावे म्हणून सहज चौकशी केली, "काय अण्णा! सकाळच्या प्रहरीच कुणीकडे ?"

बाळा वाणी चालता चालता थांबला. हात काखेत तसेच ठेवून म्हणाला, "जरा तात्याबाच्या घरी जाऊन येतो. तात्याबा फार आजारी आहे. अंथरुणाला खिळला आहे."

तो दुकानदार दुकानात बसल्या बसल्याच मनात विचार करू लागला. तात्याबा आणि आजारी! चांगला तालिमबाज गडी असा एकाएकी आजारी कसा पडला! गावात तर कसली साथ दिसत नाही. मग याला असे एकाएकी आजारी पडायला झाले काय!

त्या दुकानदाराच्या डोळ्यांसमोर तात्याबाची उमदी मूर्ती आली.

सदा घाईत असलेला उतावळ्या स्वभावाचा, पण उमद्या मनाचा हा गडी. गावातली आपल्या वयाची दहा–वीस पोरे जमवून नेहमी कसल्या तरी मोहिमेवर असणार! मग ती रामनवमीच्या उत्सवातील पिण्याच्या पाण्याची सोय असो; प्रसादाचा स्वयंपाक किंवा वाढप असो; आल्यागेल्यांची व्यवस्था असो; कुस्त्यांचे मैदान असो; किंवा दहीहंडी असो!

तात्याबाच्या नावाच्या उल्लेखाने त्या दुकानदाराला तात्याबाचे सर्व मित्रमंडळ आठवले. त्या मित्रमंडळाची तात्याबाबरील निष्ठा आठवली.

तात्याबाच्या मित्रमंडळातील प्रमुख मित्र म्हणजे रामचंदर! रामचंद्र दादाजी कोते पाटील! या रामचंद्राशिवाय तात्याबाचे पान हलणार नाही. तात्याबाचा शब्द रामचंद्र कधी खाली पडू देणार नाही.

आज किती वर्षे झाली ही जोडी फुटली नाही. तंटाबखेडा, मतभेद होऊनही जिवाभावाच्या मैत्रीत अंतर पडले नाही. जसे कोते पाटील घराण्यातील हे दोघे म्हणजे राम–लक्ष्मण! भीम–अर्जुन!

रामचंद्र फार आजारी होता हे त्या दुकानदाराला माहीत होते. तो बारल्याची खोटी बातमी गावात उठून मोठा गोंधळ उडाला हे वृत्तही अजुन ताजे होते. साहजिकच त्या दुकानदाराने बाळा वाण्याला बसल्या जागेवरूनच मोठ्याने विचारले, "आजारी पडला आहे तो रामचंदर का तात्याबा?"

बाळा वाण्याने दोन पावले पुढे होऊन, काखेतील हात काढून मोठ्याने उत्तर दिले, "आता आजारी पडला आहे तो तात्याबा! रामचंदर बरा होऊन केव्हाच हिंडफिरू लागला आहे. मघाशी मशिदीत गेलो तेव्हा बाबांच्या दर्शनाला आला होता. आता एवढ्यात जाईल बघा असाच या पेठेतून आपल्या घरी".

तो दुकानदार हसून म्हणाला, "म्हणजे तो रामचंदर उठला. आणि त्याच अंथरुणावर तात्याबा आडवा झाला म्हणा की! खरे मैतर असावेत तर हे असे! येईल ते वाटून खाणारे! मग तो नारळ असो, पेरू असो, पेढा असो, नाहीतर आजारीपण असो!"

दुकानदाराने केलेल्या त्या भाष्यावर खूष होऊन, मान डोलवून बाळा वाणी पुढे चालू लागला. तात्याबाच्या दारी येऊन पोचला. तेथे पाहतो तर रामचंद्र कोते पाटील दारातच उभा!

रामचंद्र पाटील बाळा वाण्याला येताना चांगला पाहात होता. पण त्याचे लक्ष बाळा वाण्याकडे नव्हतेच! ते होते तिसरीकडेच कोठे तरी !

अश्रूंचे ओघळ रामचंद्राच्या डोळ्यातून पुनःपुन्हा येत होते. काळ्याभोर मिशांवरून पानगळाप्रमाणे ठिपकत होते.

बाळा वाण्याने मनाशी विचार केला : रामचंद्राला तात्याबाच्या आजारामुळे दुःख होणारच. ते साहजिकच आहे. पण त्याने असे बायकांसारखे रडण्याचे कारण काय? बाबा एवढे पाठीशी असताना इतकी हाय त्याने का खावी? तात्यांबांच्या आजाराचे सर्व काही पाहाण्यास बाबा समर्थ आहेत.

बाळा वाण्याने तात्याबाच्या घरात पाऊल टाकले. तात्याबाची अवस्था डोळ्यांनी समक्ष पाहिली. तात्याबाची प्रकृती खरोखर चिंताजनकच होती. कोणत्या घटकेस काय घडेल सांगता येत नव्हते. तरीसुद्धा तेथे जमलेली माणसे बाबांवर भरवसा ठेवून होती. म्हणत होती, "त्याचा भोग भोगून झाला की बाबा त्याला उठून बसविणार! रामचंद्राप्रमाणे त्याला पुन्हा कामाला लावणार!"

आणि लोकांच्या नेमक्या याच शब्दांनी रामचंद्राचा जीव पुनःपुन्हा कासावीस होत होता. डोळ्यातील अश्रू पुनःपुन्हा वाहात होते. जणू त्याला वाटत होते : किती भावडी ही माणसे! तात्याबा हे जग सोडून निघाला तरी यांना वाटते की तात्याबा पुन्हा आपल्यात येणार! पुन्हा बाबांची सेवा करणार!

रामचंद्राच्या मनाची ही अवस्था बाळा वाण्याच्या नजरेतून सुटली नाही. त्याला एकसारखे वाटू लागले : बाबांनी रामचंद्राला काही तरी सांगितले

असले पाहिजे. त्याशिवाय आज सकाळी मशिदीतही बाबांसमोर तो असा अश्रू गाळीत बसला नसता. मिळालेल्या शापाचा उःशाप व्हावा अशा स्वरूपाची भिक्षेची याचना त्याने केली नसती. खरोखर हा रामचंद्र स्वतः आजारातून उठल्यापासून गेले काही दिवस एखादे मोठे गुपित लोकांपासून लपवून ठेवीत आहे. सृष्टीआड दृष्टी करून आसवे गाळीत आहे.

रात्री चावडीचा सोहळा पार पडल्यानंतर मंडळी घरोघरी चालली. रामचंद्र पाटीलही सर्व मित्राना टाकून एकटाच घरी जाण्यास निघाला. तेव्हा बाळा वाण्याने पुढे होऊन त्याला कोपऱ्यावर गाठले. त्याचा हात मोठ्या प्रेमाने हाती घेऊन विचारले, "रामचंदर, एक गोष्ट तुला विचारू? बाबांच्या पायाशपथ मला खरी खरी सांगशील?"

विस्तवाचा चटका बसावा तसा रामचंद्र त्यावेळी अस्वस्थ दिसला.

मग स्वतःला सावरीत बाळा वाण्याचा नाजूक प्रश्न त्याने डावलला. बाळा वाण्याला तो म्हणाला, "बाबा एवढे समर्थ असताना आपणास भिण्याचे कारण काय? तात्याचे सर्व काही बाबा पाहून घेतील."

रामचंद्र एवढे बोलला खरा. पण त्याने एक हुंदका दिला. तो हुंदका जणू बाळा वाण्याच्या मनावरून पुसून काढण्यासाठी रामचंद्र आपल्या आजाराची माहिती सांगू लागला. म्हणाला, "मी किती आजारी होतो तुम्हाला माहीत आहे च."

एक दिवस असा उगवला की वेदना सहन न होऊन मी रडू लागलो. हात जोडून मनाने बाबांची प्रार्थना केली. म्हणालो : देवा, हे असे जिणे देण्यापेक्षा मला मरण द्या. मी आनंदाने तयार आहे. आत्ता तयार आहे."

त्या मध्यरात्री बाबा मला माझ्या उशागती बसलेले दिसले. तसाच पडत, धडपडत, रडत मी उठलो. बाबांचे पाय घट्ट धरले. म्हणालो : बाबा, आता फार अंत बघू नका. मला मरण कधी येणार तेवढे सांगा. लवकर मला सोडवा. मोकळा करा."

माझे मागणे ऐकून बाबा हसले, म्हणाले, "रामचंदर, अरे तू वेडा का खुळा! मरण काय मागतोस! तुझे गंडांतर टळले जा! आता तुला काही भीती नाही! तुझी हुंडी पुरती परतली! पण त्या तात्याबाची मात्र—"

रामचंद्र कोते पाटलाने आपली जीभ चावली. बोलू नये ते आपल्या तोंडून अर्धवट बोलूनही गेले याबद्दल त्याला खंत वाटली. सावरासावर करण्याचा त्याने खूप प्रयत्न केला. पण प्रेमळ, चतुर, वडीलधाऱ्या बाळा वाण्यापुढे त्याच्या मनाचा बांध फुटला! इतके दिवस लोकांपासून दडविलेले गुपित आधी शपथ घालून बाळा वाण्यापुढे तो बोलला. म्हणाला. "बाबा

म्हणाले की तात्याबाची मात्र घडगत नाही! येत्या दसऱ्याच्या दिवशी तो जाणार! वैकुंठाला पोचणार!"

मस्तकावर वज्राघात व्हावा त्याप्रमाणे बाळा वाणी त्या दिवशी मटकन खाली बसला. आणि रामचंद्राला म्हणाला "आणि आता रे! दसरा तर आता चार दिवसावर येऊन ठेपला! या चार दिवसात बाबा पुन्हा काय लीला दाखविणार कोण जाणे!"

## ५७. बाळा सर्वज्ञ, सर्वसाक्षी, तात्याबाचा मृत्यू त्याला दिसला असेल

बाळा वाणी आपल्या घरी येऊन अंथरुणावर पडला. आपणास झोप यावी म्हणून त्याने नाना तऱ्हेने खटपट करुन पाहिली. पण त्याला झोप म्हणून येईना. उलट बाबांच्या एक एक लीलांचे स्मरण करता करता निम्मी रात्र सरली. यापुढे आपणास झोप येणे शक्य नाही या विचाराने त्याने झोपलेली गादी गुंडाळून ठेवली. म्हणाला, "आज हरिजागर!"

बाबांची पहिली लीला त्याला आठवली ती चांदोरकरांविषयीची.

नानासाहेब चांदोरकरांची बदली त्यावेळी नंदुरबारहून पंढरपुरास झाली होती. मामलेदार म्हणून नानासाहेब तेथे हजर होणार होते. परंतु त्यांनी विचार केला : शिरडीच जेथे माझे पंढरपूर आणि बाबाच जेथे माझे पांडुरंग, तेथे आधी सहकुटुंब बाबांचे दर्शन घ्यावे. नंतर ठरलेल्या दिवशी पंढरपुरी जाऊन नोकरीवर हजर व्हावे.

साहजिकच कोणासही पत्र, चिठ्ठी, निरोप काहीही न देता नानासाहेब शिरडीस येण्यास निघाले.

नानासाहेब अजून निमगावच्या शिवेवरच असतील. तोच म्हाळसापती, अप्पा शिंदे, काशिराम शिंपी यांना बाबांनी मशिदीत सांगितले. म्हणाले, "अरे, पंढरीचे दरवाजे उघडले बरे का! आता चला बघू भजनाला!"

आणि खरोखरच ते सर्वजण बाबांच्या आज्ञेनुसार टाळचा वाजवू लागले. भजन करू लागले. बाबा सांगतील तसे म्हणू लागले –

"पंढरपुरला जायाचे जायाचे । तिथेच मजला राहयाचे ।
तिथेच मजला राहयाचे राहयाचे ।। घर ते माझ्या रायाचे ।।"

ते कशाला? मुंबईचा तो हरी कान्होबा बाबांची परीक्षा पाहाण्यासाठी येथे आला. मशिदीकडे गेला. पण वर जाताना पादत्राणांची अडचण आली! निघताना मोठ्या हौसेने घेतलेले नवे कोरे, गोंडेदार पादत्राण गर्दीत कोठे हरवणार तर नाही ना, असे त्याला वाटले. शेवटी मनाचा एकदाचा धडा करून

तेथेच कोपऱ्यातील पगाऱ्याखाली पादत्राण गाडून दिले. परत येऊन पाहतो तर पादत्राण तेथे नाही! शोध शोध शोधले तरी कोठेही पत्ता नाही!

या गोष्टीमुळे तो हरी कान्होबा अतिशय कष्टी झाला. स्नान, पूजा, नैवेद्य भोजन कशाकडेही लक्ष लागेना! त्याची ही फजिती पाहून बाबांना त्याची दया आली. त्याची पादत्राणे एका काठीस अडकवून एक मुलगा बाबांनी वाड्याकडे धाडीला.

हरी कान्होबा त्यावेळी नुकता कोठे जेवण करून आचवीत होता. तोच तो मुलगा त्याच्यापुढे येऊन उभा राहिला. म्हणाला, "ही पादत्राणे मालकाला देण्यासाठी बाबांनी मला पाठविले आहे. बाबा मला म्हणाले : ही काठी वर धर आणि मोठ्याने ओरडत जा. म्हणावे 'हरी का बेटा, जरी का फेटा!'"

हरी कान्होबाला खूण तात्काळ पटली. डोळ्यातून आसवे वाहू लागली. म्हणाला, "बाबा मी अत्यंत अपराधी, पातकी. मला क्षमा करून पोटाशी घ्या. आपला म्हणा."

हरी कान्होबा हा एक सामान्य मनुष्य. त्याची गोष्ट क्षणभर बाजूला ठेवू. पण हरिद्वारचे विख्यात स्वामी श्रीसोमदेवजी यांच्यासारख्या थोर पुरुषाला बाबांच्या अधिकाराची परीक्षा करण्याची बुद्धी झाली!

नागपुरात असताना बाबांची कीर्ती स्वामींच्या कानावर आली. ती ऐकून स्वामीजी बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस येण्यास निघाले. कोपरगाव सोडून टांगा शिरडीच्या जवळ येऊ लागला तशी मशिदीवरील ती दोन निशाणे त्यांच्या नजरेस पडली. ती निशाणे पाहाताच स्वामींच्या मनात विकल्प निर्माण झाला. म्हणू लागले, "रंगीबेरंगी पताका सजवून त्या आपल्याच देवळाच्या डोक्यावर खोवणे आणि भोळ्याभाबड्या भाविकांच्या भावना उद्दीपित करणे हे काय साधुत्वाचे लक्षण झाले! आपली आरती आपणच ओवाळून घेण्याचा हा प्रकार! शिरडीच्या त्या साधूचे साधुत्व जर अशा प्रकारचे असेल तर मला त्याचे मुखावलोकनही करायचे नाही!"

एवढे बोलून त्या स्वामींनी आपला टांगा कोपरगावच्या दिशेने परत वळविलासुद्धा!

हे पाहून त्यांच्या बरोबरचे भाविक लोक त्यांची समजूत काढू लागले. म्हणाले, "त्या निशाणांचा आणि बाबांचा काय संबंध? भक्तांनी आपल्या इच्छेने निशाणे उभी केली आहेत. त्या निशाणांमुळे आपण परत जाऊ नये. एवढ्या दुरून आल्यासारखे बाबांचे दर्शन घ्यावे. मग जावे."

सहप्रवाशांच्या या आर्जवी इच्छेचा मान राखावा म्हणून ते स्वामी शिरडीत आले. बाबांच्या दर्शनासाठी मशिदीकडे आले. तेथे ती दिव्य मूर्ती दृष्टीस

पडली मात्र डोळे प्रेमाश्रूंनी भरून आले. कंठ सद्गदित झाला. मनाशी म्हणाले मी पापी. अहंकारी. कुतर्कवादी. बाबांचे दर्शन होण्यापूर्वीच मी त्यांची निंदा केली. त्यांच्याबद्दल नाही नाही ते बरळलो. त्यांचा अधिकार जाणला नाही.

स्वामी बाबांसमोर जाऊन उभे राहिले. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, "आपलेच देऊळ बांधून, त्याच्यावर रंगीबेरंगी पताका खोवून आपलीच आरती मी ओवाळून घेतो – असा भोंदू साधू म्हणजे मी ना! मग कशाला चढतोस माझ्या मशिदीची पायरी? चल हो खाली!"

हरिद्वारच्या या स्वामींमुळेच बाळा बाण्याला वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी यांची एक आठवण आठवली.

गोदातीरी राजमहेंद्री शहरी टेंबेस्वामींची स्वारी सध्या आली आहे असे नांदेडच्या पुंडलिकराव वगैरे मंडळींना कळले. स्वामी महान योगी, श्रेष्ठ भक्त, कट्टर कर्मनिष्ठ तपस्वी असा त्यांचा लौकिक कानी आल्यामुळे पुंडलिकराव वगैरे मंडळी स्वामींच्या दर्शनासाठी मुद्दाम गेली. एका प्रात:काळी स्वामींचे दर्शन त्यांना गोदेच्या घाटावरच झाले. दर्शनानंतर नांदेडकर मंडळींना 'तुम्ही कोण, कोठले, वगैरे कुशल प्रश्न करीत असतानाच शिरडीची गोष्ट निघाली. ती ऐकून स्वामी तात्काळ म्हणाले, "शिरडी हे तर आमच्या प्रिय बंधूचे निवासस्थान. आपणा सर्वांची भेट आज झाली हा योगही अपूर्व असाच आहे. तर कृपा करून आपण माझे एक काम करावे. हे श्रीफळ घ्यावे आणि ते आमच्या बंधूंना देऊन त्यांना माझे नमस्कार सांगावेत. म्हणावे : या दीनावर आपली कृपादृष्टी असू द्यावी. आज आहे असाच प्रेमलोभ निरंतर वृद्धिगत व्हावा."

स्वामींचा निरोप घेऊन, पुंडलिकराव वगैरे मंडळी तो नारळ घेऊन शिरडीकडे येण्यास निघाली. मनमाड रेल्वे स्टेशनावर गाडीतून उतरली. पुढे कोपरगावची गाडी येण्यास अवकाश होता म्हणून स्नान वगैरे करण्यास ओढ्यास गेली. तेथे स्नानानंतर भूक लागली म्हणून जवळचा चिवडा बाहेर काढला. तो फार तिखट लागला म्हणून सौम्य करण्यासाठी जवळचा एक नारळ फोडून त्या चिवड्यात घातला. नंतर सर्वांच्या ध्यानात आले की स्वामींनी बाबांना दिलेला प्रेमभेटीचा तो नारळ म्हणजे हाच आता फोडलेला.

साहजिकच पुंडलिकराव वगैरे मंडळी अत्यंत अपराधी चेहेरे करून शिरडीस बाबांच्या दर्शनास गेली. त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले "माझ्या बंधूने मला देण्यासाठी एक वस्तू तुझ्याकडे दिली, ती कोठे आहे? अरे, त्याने मोठ्या विश्वासाने नारळ तुमच्याकडे दिला आणि त्याची वासलात तुम्ही अशा रीतीने लावली! असेच का तुम्ही विश्वासू ?"

बाबा सर्व काही पाहाणारे, सर्व काही जाणणारे. तात्याबाचा मृत्यू त्यांच्या डोळ्याना दिसला असेल म्हणूनच रामचंद्राकडे ते अशा रीतीने बोलले. तो निश्चित दिवससुद्धा याच कारणामुळे त्यांनी सांगितला.

तात्याबाचा मृत्यू अकाली होणार, संबंध शिरडीगाव या पोराला मुकणार या भावनेने बाळा वाण्याचे मन कासावीस झाले. बळकटीला टेकून तो तसाच पडून राहिला. पहाटे पहाटे केव्हा थोडा डोळा लागला. परंतु कोणाच्यातरी मरणाच्या विचित्र स्वप्नाने तो लगेच खडबडून जागा झाला. उठून बसला. तोच रस्त्यावरील कोणा माणसांचे अभद्र शब्द त्याच्या कानावर आले, "तात्याबा आता या आजारातून काही उठत नाही तो अगदी जेर आहे. काही तासांचाच सोबती आहे."

## ५८. बाबा! अजूनही तात्याबाची करूणा तुम्हाला येत नाही काय?

नवरात्र संपले. दसऱ्याचा दिवस उजाडला. आज सणाचा दिवस म्हणून शिरडी गावात उत्साहाचे वातावरण पसरले. संध्याकाळी शिलंगणास जाण्यासाठी ठेवणीतील रुमाल-पागोटे बाहेर आले. जो तो म्हणू लागला, "आज दसऱ्याचा दिवस. दिवाळी आजपासून वीस दिवस राहिली."

'दसरा' हा शब्द ऐकून सर्व गावाला आनंद झाला. पण गावातील दोन व्यक्तींना मात्र घाम फुटला. हातापायातील जीव गेला. कंबर खचली.

त्या दोन व्यक्ती म्हणजे, रामचंद्र पाटील आणि बाळा वाणी.

गेले दोन दिवस हे दोघे तात्याबाच्या उशाशी बसून होते. सर्व डॉक्टरी उपाय थकले होते. आता एकच उपाय उरला होता. तो म्हणजे संकट बाबांना घालणे. तात्याबाचे प्राण वाचविण्यासाठी बाबांची करुणा भाकणे.

रामचंद्र कोते पाटील तात्याबाच्या कानाशी तोंड नेऊन त्याला सांगत होता, "तात्या तू नुसती बाबांना हाक मार. त्यांना संकट घाल. धावून आल्याशिवाय ते राहणार नाहीत."

बाळा वाणी मनाशी बाबांचा अखंड धावा करीत होता. उदीची चिमूट तात्याच्या कपाळाला लावीत होता. तात्याबाच्या जिभेवर ठेवीत होता. हात जोडून बाबांना म्हणत होता. "बाबा, आजवर कित्येकांची गंडांतरे तुम्ही दूर केली. या रामचंद्राच्या जिवावरील गंडांतर नुकतेच दूर करून त्याला बरा केला. तसा तुमच्या या लाडक्या तात्याबाला बरा करा."

तेथे जमलेल्या सर्वांच्याच डोळ्यातून मूक आसवे वाहात होती. जो तो पुनःपुन्हा हात जोडीत होता. तात्याबाच्या उशाशी असलेल्या बाबांच्या फोटोकडे पाहून म्हणत होता, "बाबा, अजूनही या तात्याबाची करुणा तुम्हाला येत नाही काय? तात्याबाचा भोग अजूनही संपला नाही काय?"

तात्याबा इकडे शेवटचे क्षण मोजत होता. तिकडे मशिदीत बाबा स्वस्थ पडून होते. अंग मुडपून मधून मधून कण्हत होते. आत मात्र अखंड धुन सुरू होती, "अल्ला मालिक! अल्ला मालिक! अल्ला मालिक!"

होता होता दुपारचे बारा वाजायला आले.

मशिदीत अगदी निवडक अशी मंडळी उरली.

श्रीमंत बुटी काकासाहेब दीक्षितांना म्हणू लागले, "बाबांचे वय तसे पुष्कळ झाले. ऐंशी वर्षाला गाठ आली. शरीर झाले तरी काम किती देणार! कधी ना कधी ते थकायचेच त्याला थंडी-पडसे, ताप-जाळ कधी तरी यायचेच."

काकासाहेब दीक्षित म्हणत होते, "रामविजयाचे दोन सप्ताह त्यांनी पाठो-पाठ ऐकले. बसून ऐकले. त्यामुळे नाही म्हटले तरी या वयात पाठीला रग लागणारच. त्यामुळेच त्यांना ताप आला. शिवाय माणसांची येथे सारखी वर्दळ. प्रत्येकजण पायावर डोके ठेवणार! वेळ-काळ न पाहाता आपली कर्मकथा सविस्तर सांगत बसणार! ती नुसती ऐकून घ्यायची म्हटले तरी या वयात केवढे श्रम! पण दुःखार्तांना त्याचे काय? त्यांना विचार फक्त स्वतःचा! बाबांच्या वयाचा आणि प्रकृतीचा त्यांना विचार नाहीं!"

मंडळी असेच काहींबाहीं बोलत आहेत तोच बाबांनी कण्हत कण्हतच लक्ष्मीबाई शिंद्यांना हाक मारली. म्हणाले, "लक्ष्मी ये! अशी माझ्या पुढे बस."

काही काही माणसांचे पूर्वसुकृतच मोठे. त्यांचे संबंधही साधुसंतांशीच यायचे. तात्याबाची आई बायजाबाई अनंतात विलीन झाली. तिची जागा घेतली ती या लक्ष्मीने!

मामीने म्हणजे, बायजाबाई कोते पाटील यांनी काटे तुडवीत रानावनात जाऊ नये म्हणूनच जणू बाबा गावात आले. मशिदीत स्थिर झाले. मामीच्या हातची भाकर तीन-त्रिकाळ मोठ्या प्रेमाने खाऊ लागले. तोच ही भावडी, प्रेमळ भक्त लक्ष्मी आली. शबरीप्रमाणे आली आणि तिने शबरीप्रमाणे म्हाळ-सापती, दादा केळकर या जुन्या भक्तांच्या बरोबरीने मशिदीत मोठ्या मानाचे स्थान पटकावले!

एक दिवस संध्याकाळच्या वेळी बाबा मशिदीत बसले होते. त्यावेळी जवळच तात्याबा होते. इतरही प्रेमाची भक्तमंडळी जवळ होती. मोठ्या प्रेमाच्या गप्पागोष्टीही चालल्या होत्या. एवढ्यात लक्ष्मी तेथे आली. बाबांना नमस्कार करून खांबाशी उभी राहिली. तेव्हा बाबा तिला म्हणाले, "लक्ष्मी! अगे, मला भूक लागली!"

ही लक्ष्मी त्यावेळी लगेच म्हणाली, "मग त्यात काय! ही निघाले! आता घेऊन येते ऊन ऊन भाकरी आणि कोरड्यास!"

लक्ष्मी त्या दिवशी आल्या पावली तशीच गेली. दहा-पाच मिनिटात घरून ऊन ऊन भाकरी आणि कोरड्यास घेऊन आली. म्हणाली, "बाबा! आणली बघा भाकरी. ऊन ऊन हाय तवर खाऊन घ्यां आधी!"

बाबांनी समोरचे पान तसेच उचलले कुत्र्यासमोर ठेवले! म्हणाले, "खा बाबा! शांतपणाने खा! भूक फार लागली होती ना"?

हे पाहून ही लक्ष्मी म्हणाली, "बाबा! हे काय केलेंसा? तुम्हाला भूक लागली म्हणून मी भाकरी आणली."

बाबा तिला म्हणाले, "लक्ष्मी! अगे ते कुत्रे आणि मी काय दोन! जसा आपला जीव तसाच त्याचा. मला बोलून सांगता तरी येते. त्याला बोलून सांगता येत नाही. एवढाच काय तो दोघात फरक. तुझी भाकरी मला पोचली जा!"

त्या दिवसापासून मशिदीत या लक्ष्मीची भाकरी सुरू झाली.

बाबांचे वय झाले. नुसती भाकरी कशी चावणार? म्हणून लक्ष्मी ती भाकरी दुधात कुसकरून ठेवी. बाबांच्या जेवणाच्या वेळी मशिदीत पाठवी. काही कारणाने लक्ष्मीची भाकरी यायला उशीर झाला तर बाबा हात आखडून पानावर एखाद्या लहान मुलाप्रमाणे बसत. म्हणत, "अजून कशी आली नाही लक्ष्मीची भाकरी आज?"

कधी कधी तिसऱ्या प्रहरी बाबांना शेवया खाण्याची लहर येई. लक्ष्मीला म्हणत, "लक्ष्मी! जा गे, मला तुझ्या घरून शेवया खायला घेऊन ये."

लक्ष्मी घाईघाईने शेवया घेऊन येई. बाबा त्या भांड्यातील शेवया खात. किती तर अगदी नावाला! उरलेले उष्टे भांडे लक्ष्मीपुढे सारत. म्हणत, "लक्ष्मी! माझे एक काम करशील? जा! त्या राधाकृष्णीला या शेवया नेऊन दे. तिला सांग – म्हणावे या शेवया बाबांच्या उष्ट्या आहेत. माझे उष्टे-खाण्यासाठी ती अगदी जीव टाकते बघ!

लक्ष्मीच्या या अशा किती गोष्टी! बाबांचा तिच्यावर केवढा लोभ! त्या लोभापोटीच बाबांनी आजही तिला समोर बोलाविले. म्हणाले, "लक्ष्मी! ये अशी! कर पुढे तुझा हात!"

लक्ष्मीने भक्तिभावाने हात पुढे केला.

बाबांनी खिशात हात घालून प्रथम पाच रुपये बाहेर काढले. नंतर पुन्हा खिशात हात घालून चार रुपये बाहेर काढले. असे एकदा पाच आणि दुसऱ्या-वेळी चार असे नऊ रुपये बाबांनी लक्ष्मीच्या हातात घातले. जणू बसलेले नवरात्र आज संपले. उठले. आता उरले ते एक सीमोल्लंघन!

लक्ष्मी घरची तशी खाऊन पिऊन सुखी. सधन. म्हटली तर श्रीमंतच. तिला या नऊ रुपयांचे काय होय! एवढे रुपये तिने बाबांच्या चरणी दक्षिणा

म्हणून सहज अर्पणही केले असते. परंतु बाबांच्या हातून मिळालेले ते नऊ रुपये तिला नवनिधिप्रमाणे वाटले. आपल्या नवकोटकल्याणाचा भाग्यक्षण हाच असे तिला वाटले. माहेरचे प्रेमाचे स्त्रीधन प्रेमळ पित्याच्या हातून लाभताना वाटून तिने बाबांच्या चरणी मस्तक ठेवले.

होता होता मशिदीच्या माथ्यावरील सूर्य पश्चिमेकडे झुकू लागला. घड्याळाचा तास–काटा पुढे पुढे सरकू लागला. श्रीमंत बापुसाहेब बुटी आणि काकासाहेब दीक्षित यांना बाबा म्हणू लागले, "काका! बापू! तुम्हाला जेवणाला वेळ होतोय. आता जा पाहू वाड्यात! जेवण करून मग या माझ्याकडे."

काकांना आणि बापूंना बाबांच्या जवळून उठवेना. आजार तसा मोठा नसला म्हणून काय झाले! कण्हत–कुंथत असलेल्या बाबांना मशिदीत तसेच टाकून घास गिळवेल तरी कसा? अन्न खाववेल तरी कसे?

तरी पण बाबांच्या आज्ञेप्रमाणे वाड्यात जाऊन, दोन घास घशाखाली ढकलून लगेच परत यावे म्हणून ते दोघे उठले. जड पावलांनी मशिदीच्या पायऱ्या उतरले. मनाशी म्हणाले : भोजनापेक्षाही महत्त्वाचे आहे ते बाबांचे आज्ञापालन*

वाड्यात येऊन, पानावर बसून, घास तोंडात घालतात तोच मागून माणूस हजर! घाबऱ्या घुबऱ्या तो मनुष्य म्हणत आहे, "आधी मशिदीकडे चला. तेथे काय प्रकार घडला आहे पहा"

समोरचे भरलेले पान तसेच टाकून ते दोघे धावतच मशिदीत आले. पाहातात तर तेल संपून दिवा शांत झालेला! बयाजी अप्पा कोते पाटलांच्या मांडीवर बाबांचा निचेष्ट देह विसावलेला! लक्ष्मीबाई शिंदे, बाप्पाजी रत्नपारखी, बाळाजी गुरव आणि बयाजी कोते पाटील ही स्थानिक भक्त मंडळी मूकपणे आसवे गाळत असलेली!

हे करुण दृश्य पाहून काका आणि बापू यांचे हातपाय गळाले. जीभ कोरडी पडली. डोळे नकळतच वाहू लागले. प्रिय मातेचे प्रेत आकस्मिकपणे दृष्टीस पडताच पुत्रांनी टाहो फोडावा तसा त्या दोघांनी टाहो फोडला. म्हणाले "बाबा! बाबा! एवढ्यातच तुम्ही कोठे गेला!"

त्या दोघांच्या या शब्दांनी सबंध मशीद शोकाने गदगदली. उचंबळली आणि काही क्षणातच सर्वजण लहान मुलाप्रमाणे रडू लागले

*आज्ञापालन तें हे आपले पाहिले कर्तव्य

# साईबाबांचे दर्शन घेऊ या

चला शिरडीला आपण जाऊ या ।
साईबाबांचे दर्शन घेऊ या ॥धृ.॥

साई समाधि आपण पाहू या
भक्ति–भावाने नमन करू या
ब्रम्हानंदाने गाणी गोड गाऊ या

ब्रम्हानंदाने गाणी गोड गाऊ या
प्रेमे भजनात दंगुन जाऊ या ॥१॥

होती कितीतरी माणसं नास्तिक
त्यांना बाबांनी बनविलं आस्तिक
समता, बंधुता, एकता निर्मूया
जातिभेदास गाडुन टाकू या ॥२॥

साईबाबा खरे ज्ञान योगी
नव्हते स्वार्थी मुळी लुच्चे ढोंगी
ईश प्रेषित बाबांना स्मरूया
भाव सुमनांची माला त्यांना वाहू या ॥३॥

–दत्ताराम आ. बारस्कर.

# साईराम मेघश्याम

साईराम मेघश्याम जानकी जीवन राम राम
भजरे मन तू साईराम साईराम
दशरथ नंदन राम राम
जानकी जीवन राम राम साईराम मेघश्याम
कौसल्ये के राम तुम साईराम
जानकी के प्राण तुम साईराम
भरत की जान तुम साईराम
भजरे मन तू साईराम साईराम
साईराम मेघश्याम जानकी जीवन राम राम

–सौ. कलावती वसंतराव चव्हाण.

# सेतु जणुं शोधिला !

देव हा देत दर्शनाला,
निराकारही, आकारांतुन, प्रकट मूर्त झाला ॥धृ.॥
विकसित मनुजा, सुचे कल्पना.
आतुर जाहला मूर्ति घडविण्या,
परमात्म्याशीं जोडायाचा! सेतू जणुं शोधिला! देव हा १
प्रेम घृणा ही आकाराची
अनुभव दौलत ती मूर्ताची
अमूर्ताकडे नेणारे हे द्वार गमे त्याजला! देव हा । २
शब्दांतुनि निःशब्दांमधली,
व्यक्तांतुन अव्यक्तामधली,
उड्डाणाला मोका जागा, गवसे मनुजाला! देव हा । ३
नाही पात्रता, नाहि क्षमता,
पहावयाला, जगच्चालका,
विज्ञानाचे ध्यान गणित ते, राखुनि दावि कला! देव हा । ४

—लक्ष्मीतनया

# — आरती साईबाबांची —

जयदेव जयदेव जय साईनाथा, हे दीनानाथा,
आरती ओवाळू, चरणी तव माथा । जयदेव जयदेव ॥धृ.!॥
आपुल्या प्रसादे, मालिन्य गेले ।
विकारी मन, पवित्र झाले ।
त्रिभुवनी तुमच्या, नामाचा डंका ।
नित्य निनादे, ऐका हो ऐका ॥ जयदेव ...॥१॥
शिरडी ग्रामाशी, पुनीत केले ।
पाणी ओतूनी दीप जाळिले ।
अगाध महिमा, बाबा आपुला ।
भक्तांचा कैवारी, भक्तवत्सला ॥ जयदेव ...॥२॥
तुमच्या दर्शने, मनाला शांती ।
लाभो एवढी, आहे विनंती ।
प्रार्थना आता, एकचि आहे ।
मुखी "साईनाथ" सतत राहे । जयदेव ...॥३॥

—श्रीकृष्ण न. गंधे.

## ॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

मंदिरी घाली प्रदक्षिणा ।
श्रीसाई पावतो भक्तांना ।
नित्य करिता रे आरती ।
संकटी भक्ता ते तारती ॥१॥
धर्म साईचा हा खरा ।
द्वैतास नच उरे थारा ।
जगी हा मोहाचा पसारा ।
श्री भक्तीस देतो आसरा ॥२॥
हा जड देहाचा पिंजरा ।
पंचभूते घेती आसरा ।
जीव शिव आत्मा रमला ।
सर्वातून मुक्त राहिला ॥३॥
हट्ट योग साधन केले ।
ते आत्म स्वरूपी रमले ।
परी शांती दिसेना ठायी ।
साईविण मुक्तीच नाही ॥४॥
नाम जप जो नित्य करी ।
साई तया जवळ धरी ।
मन रे करावे निर्मळ ।
त्वरित त्यास मिळे फळे ॥५॥

—रा. मा. आडकर.

## साईचा धांवा

साईनाथा भाग्यविधाता तू अमुचा स्वामी
बालक आम्हीं सदा रंगतो तुझ्याच रे नामी
तुझ्या प्रीतीचा सागर उसळे अमुच्या हृदयांतरी
संकट समयी धांवा करिता तू आम्हां तारी
शिर्डीमध्ये आम्हांस भासे देवाची नगरी
साई देवा तुझ्या दर्शना येती नरनारी
दुःख, दैन्य अन् दारिद्र्याने मानव पिडलेला
तुम्हीच साईनाथा नेता उद्धरुनी सकला
मी भुकेला साईनाथा तुझ्या दर्शनाला
क्षणा क्षणाला आठव येते तुझी साई मजला
एकच वर मी तुम्हां मागतो देवाधिदेवा
तुमच्या चरणी सदैव राहून घ्यावी मम सेवा

—सूर्यकांत मा. गर्जे

# —अनुक्रमणिका—आक्टोबर १९७५


| | |
|---|---|
| १) सप्रेम नमस्कार | —संपादकीय |
| २) श्रीसाईबाबा मंदिर, म्हाण | —श्री. चंद्रकांत सामंत |
| ३) श्रीसद्गुरु ताजुद्दीन बाबा | —डॉ. अनिल जायस्वाल |
| ४) श्रीसंत कथामृत | —श्री. अनंत काणे |
| ५) कळाच अमुची न्यारी | —श्री. द. शं. टिपणीस |
| ६) ईश्वराचे अस्तित्व | —श्री. बाळकृष्ण घामणकर |
| ७) श्रीसाईनाथ | —श्री. र. श्री. पुजारी |
| ८) साईबाबांचे दर्शन घेऊ या | —श्री. दत्ताराम बारस्कर |
| ९) श्रीसाईराम मेघश्याम | —सौ. कलावती वसंत चव्हाण |
| १०) मेरू जणू शोभिला | —लक्ष्मीतनया |
| ११) आरती साईबाबांची | —श्रीकृष्ण गंधे |
| १२) श्रीसाईनाथ प्रसन्न | —श्री. रा. मा. आडकर |
| १३) साईचा धावा | —श्री. सूर्यकांत मा. गर्जे |

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर **श्री. डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, **मुंबई–३१.**

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर **रोड,**

खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, **मुंबई–१४.**